# महाराष्ट्र विधानसभा

## दुसरे अधिवेशन, २०१५

---

## तारांकित प्रश्नोत्तरांची यादी

**गुरुवार, दिनांक २३ जुलै, २०१५ / श्रावण १, १९३७ ( शके )**

| | | |
|---|---|---|
| **(१)** | **सहकार, पणन आणि वस्त्रोद्योग, सार्वजनिक बांधकाम (सार्वजनिक उपक्रम वगळून) मंत्री** | **यांचे प्रभारी विभाग** |
| **(२)** | **आदिवासी विकास मंत्री** | |
| **(३)** | **उद्योग मंत्री** | |
| **(४)** | **सार्वजनिक बांधकाम (सार्वजनिक उपक्रम) मंत्री** | |
| **(५)** | **सामाजिक न्याय आणि विशेष सहाय्य मंत्री** | |

---

**प्रश्नांची एकूण संख्या - ५५**

---

### गणोरी ते नायगांव (ता. फुलंब्री) या रस्त्यावरील पुल दुरुस्त करण्याबाबत

**(१) * २६०९४ श्री.संदीपानराव भुमरे (पैठण) :** सन्माननीय **सार्वजनिक बांधकाम (सार्वजनिक उपक्रम वगळून) मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) गणोरी ते नायगांव (ता. फुलंब्री) रस्त्यावर सार्वजनिक बांधकाम विभागाने दोन महिन्यापूर्वी बांधलेला पुल दिनांक ११ जून, २०१५ रोजी वा त्या सुमारास झालेल्या पावसात वाहून गेला आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर पूल वाहून गेल्यामुळे वाहनधारकांना वाहतुकीस अडचण निर्माण झाली आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, याबाबत शासनाने चौकशी केली आहे काय, त्यात काय आढळून आले,

(४) तद्नुसार तातडीने उपरोक्त पुल दुरुस्त करण्याबाबत शासन स्तरावर कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) तसेच संबंधित ठेकेदारावर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(६) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. चंद्रकांत पाटील :** (१) व (२) सदर रस्त्यावर पुलाचे बांधकाम नसून सिमेंट पाइपचा नळकांडी पूल बांधण्याचे काम प्रगतीत होते. मात्र दरम्यानच्या अतिवृष्टीमुळे आलेल्या पुराने मुरुमाचा भराव वाहून गेला. त्यामुळे वाहनधारकांना वाहतुकीस अडचण निर्माण झाली होती.
(३), (४) व (५) संबंधित ठेकेदारांकडून त्यांचे खर्चाने दुरुस्ती करुन रस्ता वाहतुकीस सुस्थितीत करण्यात आलेला आहे.
(६) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

**मध्यवर्ती रुग्णालय, उल्हासनगर-३, ठाणे**
**येथील दुरुस्तीच्या कामाबाबत**

**(२) * २६२२७ श्रीमती ज्योती कलानी (उल्हासनगर), श्री.रमेश कदम (मोहोळ), श्री.भास्कर जाधव (गुहागर), श्री.जितेंद्र आव्हाड (मुंब्रा कळवा) :** सन्माननीय **सार्वजनिक बांधकाम (सार्वजनिक उपक्रम वगळून) मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मध्यवर्ती रुग्णालय, उल्हासनगर-३, ठाणे येथील दुरुस्तीच्या कामाचे अंदाजपत्रक मान्यतेसाठी अधिक्षक अभियंता, ठाणे व कार्यकारी अभियंता, सार्वजनिक बांधकाम विभाग, ठाणे यांचेकडे दिनांक २९ डिसेंबर, २०१२ तसेच दिनांक १७ डिसेंबर, २०१४ रोजी पाठविले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, या रुग्णालयाची त्वरीत दुरुस्ती करणेबाबत स्थानिक लोकप्रतिनिधींनी पत्राव्दारे दिनांक २७ मे, २०१५ रोजी शासनाकडे विनंती केली आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, रुग्णालयाची दुरुस्ती करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. चंद्रकांत पाटील :** (१) अंशतः खरे आहे.

मध्यवर्ती रुग्णालय, उल्हासनगर ३, ठाणे येथील दुरुस्तीच्या कामाची अंदाजपत्रके कार्यकारी अभियंता, ठाणे बांधकाम विभागाने तयार करुन जिल्हा शल्यचिकित्सक, उल्हासनगर मार्फत दि. २९/१२/२०१४ रोजी मंजूरी प्राप्त करण्यासाठी उपसंचालक, आरोग्य सेवा, मुंबई मंडळ, ठाणे यांचेकडे प्रशासकीय मान्यता व निधी उपलब्धतेसाठी सादर करण्यात आलेली आहेत.

(२) हे खरे आहे.

(३) दुरुस्तीची अंदाजपत्रके आरोग्य विभाग, मुंबई यांचेकडे सादर करण्यात आली असून त्यांचेकडून मंजूरी अपेक्षित आहे. मंजूरीनंतर तातडीने दुरुस्ती कामे हाती घेण्यात येणार आहे.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

**सांगली जिल्ह्यातील अनुदानित वसतिगृहांना भोजन अनुदान न मिळाल्याबाबत**

**(३) * २५६५७ श्री.अनिल बाबर (खानापूर) :** सन्माननीय **सामाजिक न्याय मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) सांगली जिल्ह्यातील अनुदानित वसतिगृहांना सन २०१४-१५ चे भोजन अनुदान मिळाले नसल्याचे माहे एप्रिल, २०१५ च्या तिसऱ्या आठवड्यात वा त्यासुमारास निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, याबाबत शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले आहे,

(३) असल्यास, सदर अनुदान केव्हापर्यंत वितरीत करण्यात येणार आहे व याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत व याबाबतची सद्य:स्थिती काय आहे ?

**श्री. राजकुमार बडोले :** (१), (२), (३) व (४) होय हे खरे आहे.

सांगली जिल्ह्यात एकूण ६७ अनुदानित वसतिगृहे आहेत. यापैकी ६३ वसतिगृहे योजनेतर लेखाशीर्षाखाली असून या लेखाशीर्षाखाली सन २०१४-१५ मध्ये पुरेशी तरतूद उपलब्ध न झाल्याने सन २०१४-१५ च्या देय भोजन अनुदानापैकी ५०% म्हणजेच रु.१,१८,०८,१८३/- एवढे अनुदान अदा करण्यात आले आहे. उर्वरीत ४ वसतिगृहे योजनांतर्गत लेखाशीर्षाखाली असून या लेखाशीर्षाखाली उपलब्ध तरतुदीतून सन २०१४-१५ च्या देय भोजन अनुदानापैकी ६५% म्हणजेच रु.६,२७,०१२/- एवढे अनुदान वसतिगृहांना अदा करण्यात आले आहे.

अनुदानित वसतिगृहांच्या प्रलंबित देयकांबाबत विधानमंडळाच्या पावसाळी अधिवेशनात रु.६३२४.५३ लक्ष एवढ्या रकमेची पूरक मागणी सादर करण्यात आली आहे. निधीच्या उपलब्धतेनुसार सदर वसतिगृहांची प्रलंबित देयके अदा करण्याची कार्यवाही करण्यात येईल.

-----------------

**रत्नागिरी सार्वजनिक बांधकाम विभागातील उपअभियंता व शाखा अभियंता यांनी ठेकेदारांना कामे देताना केलेला गैरव्यवहार**

**(४) * २५७४७ श्री.तुकाराम काते (अणुशक्ती नगर) :** सन्माननीय **सार्वजनिक बांधकाम (सार्वजनिक उपक्रम वगळून) मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) रत्नागिरी सार्वजनिक बांधकाम विभागातील संगमेश्वर (देवरूख) उत्तर विभाग रत्नागिरी येथील उपअभियंता व शाखा अभियंता हे ठेकेदारांना कामे देताना मोठ्या प्रमाणात गैरव्यवहार करीत असल्याने त्यांची तातडीने चौकशी करण्यात यावी अशी मागणी लोकप्रतिनिधींनी दिनांक ९ जून, २०१५ रोजी मा.मुख्यमंत्री, सार्वजनिक बांधकाम मंत्री, अ.मु.स., सचिव, रस्ते व मुख्य अभियंता, सार्वजनिक बांधकाम विभाग यांच्याकडे पत्राद्वारे केली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, या प्रकरणी चौकशी करण्यात आली आहे काय, चौकशीत काय आढळून आले,

(३) असल्यास, त्या अनुषंगाने लोकप्रतिनिधींनी केलेल्या मागणीनुसार संबंधितांवर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, होणाऱ्या विलंबाची कारणे काय आहेत तसेच याबाबतची सद्य:स्थिती काय आहे ?

**श्री. चंद्रकांत पाटील :** (१) होय, हे खरे आहे.

(२), (३) व (४) प्रस्तुत प्रकरणी मुख्य अभियंता, मुंबई (सा.बां) प्रादेशिक विभाग, मुंबई यांच्याकडून चौकशी प्रगतीत आहे. चौकशी अद्यापी पुर्ण झाली नसल्याने कारवाईचा प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

**भिवंडी तालुक्यातील (जि.ठाणे) गोदरेज कंपनीच्या इलेक्ट्रॉनिक वस्तुच्या गोदामाला आग लागल्याबाबत**

**(५) * २४६६५ श्री.प्रताप सरनाईक (ओवळा माजिवडा), श्री.अर्जुन खोतकर (जालना), श्री.सुनिल केदार (सावनेर), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) भिवंडी तालुक्यातील (जि.ठाणे) पडघा गावाच्या हद्दीतील गोदरेज कंपनीच्या इलेक्ट्रॉनिक वस्तुच्या १५ गोदामाला दिनांक १५ मे, २०१५ च्या सुमारास आग लागली, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, आग लागण्याची कारणे काय आहेत तसेच सदर आगीत किती जिवित व वित्त हानी झाली आहे,

(३) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस :** (१) दि. १५.५.२०१५ रोजी २० क्यूब गोदाम, खडवली फाटा, पडघा, तालुका भिवंडी, जि. ठाणे येथील गोदरेज वेअरहाऊसला आग लागली होती.

(२) व (३) सदर आगीबाबत पडघा पोलीस ठाणे येथे अकस्मात जळीत रजिस्टर क्र.०४/२०१५ अन्वये नोंद घेण्यात आलेली आहे. आगीमध्ये कोणतीही जिवितहानी झालेली नसून रु.१९,२४,५१,७९०/- एवढी वित्त हानी झालेली आहे.

आगीच्या कारणांबाबत विद्युत निरीक्षक, ठाणे आणि न्यायसहाय्यक वैज्ञानिक प्रयोगशाळा यांचे अभिप्राय अप्राप्त आहेत. सदर घटनेचा अधिक तपास सुरु आहे.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## आर्णी मतदार संघातील विकास कामे नाबार्ड २० मध्ये समाविष्ट करण्याबाबत

**(६) * २५२५६ श्री.राजु तोडसाम (अर्णी) :** सन्माननीय **सार्वजनिक बांधकाम (सार्वजनिक उपक्रम वगळून) मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) आर्णी मतदार संघातील विकास कामे नाबार्ड २० मध्ये समाविष्ट करण्याबाबतचे निवेदन स्थानिक लोकप्रतिनिधी (आर्णी) यांनी मा.सहकार मंत्री, म.रा.मुंबई यांना दिनांक १२ मार्च, २०१५ रोजी वा त्यासुमारास दिले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर निवेदनावर शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. चंद्रकांत पाटील :** (१) हे खरे आहे.

(२) मा.स्थानिक लोकप्रतिनिधींनी सुचविल्यानुसार नाबार्ड २० अंतर्गत आर्णी तालुक्यातील

१. अकोला बाजार-बोरगाव-तळणी रस्त्याचे रुंदीकरण, मजबुतीकरण व डांबरीकरण करणे (कि.मी. ६/२०० ते ९/३००) व

२. कोसदणी-कवठाबाजार रस्त्यावर कि.मी. ००/८०० मध्ये लहान पूलाचे बांधकाम करणे.

या दोन्ही कामांस मंजूरी प्राप्त असून, सदर कामे निविदास्तरावर प्रगतीत आहेत.

(३) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

**शासनाने आदिवासी विभागाच्या सचिवांकडून थेट आदिवासी ग्रामपंचायतीच्या खात्यात विकास निधी हस्तांतरित करण्याचा घेतलेला निर्णय**

**(७) * १६३५० श्री.राधाकृष्ण विखे-पाटील (शिर्डी), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी), श्री.दिलीप वळसे-पाटील (आंबेगाव), श्री.राणाजगजीतसिंह पाटील (उस्मानाबाद), श्री.जितेंद्र आव्हाड (मुंब्रा कळवा), श्री. शामराव उर्फ बाळासाहेब पाटील (कराड उत्तर), श्री.पांडुरंग बरोरा (शहापूर), श्री.भास्कर जाधव (गुहागर), श्री.रमेश कदम (मोहोळ), श्री.अवधूत तटकरे (श्रीवर्धन), श्री.वैभव पिचड (अकोले), श्री.सुरेश लाड (कर्जत), श्री.मकरंद जाधव-पाटील (वाई), श्री.हनुमंत डोळस (माळशिरस), श्री.राहुल मोटे (परांडा), श्रीमती दिपिका चव्हाण (बागलाण), श्री.संजय कदम (दापोली), श्री.दत्तात्रय भरणे (इंदापूर), श्री.गणपत गायकवाड (कल्याण पूर्व), श्री.संजय केळकर (ठाणे), श्री.सुभाष भोईर (कल्याण ग्रामीण), श्री.कीर्तिकुमार उर्फ बंटी भांगडिया (चिमूर), श्री.नरहरी झिरवाळ (दिंडोरी), श्री.कुणाल पाटील (धुळे ग्रामीण), श्री.किसन कथोरे (मुरबाड), डॉ.सुधाकर भालेराव (उदगीर), डॉ.बालाजी किणीकर (अंबरनाथ), डॉ.सतीश (अण्णासाहेब) पाटील (एरंडोल) :** सन्माननीय **आदिवासी विकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) अर्थसंकल्पात सर्वाधिक तरतूद आदिवासी विभागासाठी होत असतानाही प्रशासकीय यंत्रणेतील भ्रष्टाचारामुळे शासकीय योजना शेवटच्या स्तरापर्यंत पोचत नसल्याने मंत्रालय ते ग्रामपंचायतदरम्यान असलेली प्रशासकीय साखळी तोडून आदिवासी विभागाचे सचिवांकडून थेट आदिवासी ग्रामपंचायतीच्या खात्यात विकास निधी हस्तांतरित करण्याची अभिनव योजना राबविण्याचा निर्णय शासनाने घेतला आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर योजनेचे थोडक्यात स्वरुप काय आहे,

(३) असल्यास, उपरोक्त योजनेनुसार दिनांक ३१ मे, २०१५ अखेर किती ग्रामपंचायतींना निधी हस्तांतरित करण्यात आला आहे,

(४) असल्यास, सदर निधी खर्च करण्याचे निकष काय आहेत व सदर योजना कोणत्या माध्यमातून राबविण्यात येणार आहे व त्याची फलनिष्पती काय आहे ?

**श्री. विष्णु सवरा :** (१) व (२) आदिवासी उपयोजनेंतर्गत प्राप्त होणा-या एकूण नियतव्ययाच्या ५ टक्के निधी अनुसूचित क्षेत्रातील ग्रामपंचायतींना व त्या अंतर्गत गावे/वाड्या/वस्त्या/पाडे यांना त्यांच्या लोकसंख्येच्या प्रमाणात देण्याबाबतचा शासन निर्णय दिनांक २१.०४.२०१५ रोजी निर्गमित करण्यात आला आहे. त्यानुषंगाने सदरचा निधी अ) पायाभूत सुविधा, ब) वन हक्क अधिनियम (FRA) व पेसा (PESA) कायद्याची अंमलबजावणी, क) आरोग्य, स्वच्छता, शिक्षण व ड) वनीकरण, वन्यजीव संवर्धन, जलसंधारण, वनतळी, वन्यजीव पर्यटन व वन उपजिविका या बाबींकरीता उपलब्ध करुन देण्यात येणार आहे. सदरचा निधी अनुसूचित क्षेत्रातील २८३५ ग्रामपंचायतींना त्या अंतर्गत गावे/वाड्या/वस्त्या/पाडे यांना एकूण लोकसंख्येच्या प्रमाणात शासन स्तरावरुन RTGS व्दारे थेट उपलब्ध करुन देण्यात येणार आहे.

(३) या योजनेतर्गत ५ % निधी पुरवणी मागणीव्दारे अर्थसंकल्पित करणेबाबतचा पुरवणी मागणी प्रस्ताव सादर केला आहे.

(४) कामाची निवड व निधी खर्च करण्याचे अधिकार ग्राम सभेला आहेत. त्यामध्ये रु. ३.०० लाखापेक्षा कमी मुल्याच्या कामास स्वतंत्र तांत्रिक मान्यतेची आवश्यक असणार नाही व रु. ३.०० लाखापेक्षा अधिक मुल्याच्या कामास संबंधित सक्षम तांत्रिक अधिका-यांमार्फत तांत्रिक मान्यता देण्यात येणार आहे.

-----------------

## लोणार तालुक्यात (जि. बुलढाणा) शाखा अभियंता व ठेकेदार यांनी संगनमताने केलेला गैरव्यवहार

**(८) * १९७७२ डॉ.संजय रायमुलकर (मेहकर) :** सन्माननीय **सार्वजनिक बांधकाम (सार्वजनिक उपक्रम वगळून) मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) सार्वजनिक बांधकाम विभागाचे उपविभागीय अभियंत्यासह शाखा अभियंता व ठेकेदारांच्या संगनमताने लोणार तालुक्यात (जि. बुलढाणा) सुरु करण्यात आलेल्या कामात कमी व निकृष्ट दर्जाचे साहित्य वापरून लाखो रुपयांचा गैरव्यवहार केल्याने याकामांची उच्चस्तरीय चौकशी करुन दोषींवर कारवाई करण्याची मागणी स्थानिक लोकप्रतिनिधींनी संबंधित अधिकाऱ्यांकडे माहे जानेवारी, २०१५ मध्ये वा त्या दरम्यान केली, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उपरोक्त मागणीच्या अनुषंगाने सदर गैरव्यवहाराची चौकशी करण्यात आली आहे काय, असल्यास, त्यात काय आढळून आले, तसेच चौकशीनुसार संबंधित दोषी व्यक्तींविरुध्द कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. चंद्रकांत पाटील :** (१) निवेदन प्राप्त झाल्याचे आढळून येत नाही.
(२) व (३) प्रश्न उद्भवत  नाही.

-----------------

**खालापूर (जि.रायगड) येथील औद्योगिक वसाहतीमधील कामगारांना आरोग्य सुविधा पुरविण्याबाबत**

**(९) * २०९८९ श्री.सुरेश लाड (कर्जत), श्री.जितेंद्र आव्हाड (मुंब्रा कळवा), श्री.रमेश कदम (मोहोळ), श्री.भास्कर जाधव (गुहागर), श्री.पांडुरंग बरोरा (शहापूर), श्री.अवधूत तटकरे (श्रीवर्धन), श्री.किसन कथोरे (मुरबाड) :** सन्माननीय **कामगार मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) खालापूर (जि.रायगड) येथे उभारण्यात आलेल्या औद्योगिक वसाहतीमध्ये काम करणाऱ्या कामगारांसाठी कोणतीही आरोग्य सुविधा पुरविण्यात न आल्याने कामगारांचे शोषण होत आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले व तद्नुसार सदर वसाहतीतील कंपनी व्यवस्थापक व ठेकेदार यांचेवर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,
(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**(उत्तर आले नाही.)**

-----------------

**तिसंगी (ता.पंढरपूर, जि.सोलापूर) येथील लाभार्थ्यांची संजय गांधी व श्रावणबाळ योजनेची अनेक प्रकरणे प्रलंबित असल्याबाबत**

**(१०) * २५९५८ श्री.भारत भालके (पंढरपूर), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी) :** सन्माननीय **सामाजिक न्याय मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) तिसंगी (ता.पंढरपूर, जि.सोलापूर) येथील लाभार्थ्यांची संजय गांधी व श्रावणबाळ योजनेची अनेक प्रकरणे मंजूरीसाठी संबंधित विभागाकडे पडून असल्याने लाभार्थ्यांनी तहसील कार्यालयासमोर आमरण उपोषणाचा इशारा माहे मे, २०१५ मध्ये वा त्या दरम्यान दिला आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त प्रकरणे मंजूर करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली तसेच प्रलंबित प्रकरणे मंजूर करण्यास दिरंगाई करणा-यांवर शासनाने कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. राजकुमार बडोले :** (१) श्री.सुधाकर महादेव महानवर रा.तिसंगी यांनी अशा स्वरुपाचे निवेदन दि. २६.०५.२०१५ रोजी जिल्हाधिकारी, सोलापूर यांना दिले आहे.

(२) सदर निवेदनात नमूद केलेल्या ४० प्रकरणांपैकी तहसिल कार्यालय, पंढरपूर यांचेकडे केवळ १९ प्रकरणे प्राप्त झालेली असून उर्वरीत २१ प्रकरणे आवश्यक कागदपत्रांसह संबधित तलाठ्याकडे जमा करण्याबाबत निवेदनकर्त्यास कळविले आहे. तहसिल कार्यालयाकडे प्राप्त १९ प्रकरणांपैकी १० प्रकरणांना मंजुरी दिली आहे व उर्वरीत ९ प्रकरणे संजय गांधी योजना समितीसमोर निर्णयार्थ ठेवण्यात येत आहेत.

(३) प्रश्न उद्भवत  नाही.

-----------------

**औरंगाबाद येथील सार्वजनिक बांधकाम उपविभाग क्र.१ मधील अभियंत्यांनी केलेल्या अपहाराची चौकशी करण्याबाबत**

**(११) * २६७८०   श्री.हेमंत पाटील (नांदेड दक्षिण), श्री.सुभाष साबणे (देगलूर) :** सन्माननीय **सार्वजनिक बांधकाम (सार्वजनिक उपक्रम वगळून) मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) औरंगाबाद येथील सार्वजनिक बांधकाम उपविभाग क्र.१ मधील उपविभागीय अभियंता व शाखा अभियंता यांनी केलेल्या लाखो रुपयांच्या अपहाराची चौकशी करण्याची मागणी दिनांक १६ एप्रिल, २०१५ रोजी वा त्या सुमारास जिल्हाधिकारी तसेच संबंधित अधिकाऱ्यांकडे केली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, या प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, त्यात काय आढळून आले,

(३) चौकशीनुसार पुढे कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(४) अद्याप कारवाई केली नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. चंद्रकांत पाटील :** (१) होय, सदर तक्रार अधीक्षक अभियंता, सार्वजनिक बांधकाम मंडळ, औरंगाबाद यांना प्राप्त झालेली आहे.

(२) व (३) या प्रकरणी अधीक्षक अभियंता, सार्वजनिक बांधकाम मंडळ, औरंगाबाद यांचेमार्फत चौकशी सुरु असून चौकशी अहवाल प्राप्त होताच पुढील योग्य ती कारवाई करण्यात येईल.
(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

**राज्यातील सहकारी संस्था व बाजार समित्यांनी केलेला गैरव्यवहार**

**(१२) * २०८१५ श्री.विजय औटी (पारनेर) :** सन्माननीय **सहकार मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) राज्यातील सुमारे १ हजार सहकारी संस्था व बाजार समित्यांनी गैरव्यवहार केल्याबाबत त्यांची चौकशी करण्याचे आदेश मा.सहकार मंत्री यांनी सांगली येथे दिनांक १४ एप्रिल, २०१५ रोजी वा त्यासुमारास दिलेले आहेत, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, संबंधित सहकारी संस्था व बाजार समित्या यांची चौकशी केली आहे काय,
(३) असल्यास, आतापर्यंत किती संस्था व बाजार समितीने गैरव्यवहार केल्याचे उघड झाले आहे,
(४) असल्यास, दोषी संस्था व बाजार समित्यांविरुध्द शासनाने कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. चंद्रकांत पाटील :** (१) नाही.
(२) प्रश्न उद्‌भवत नाही.
(३) प्रश्न उद्‌भवत नाही.
(४) प्रश्न उद्‌भवत नाही.
(५) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

**उमरगा-कोरेगाववाडी (दंडाची वाट) (ता.उमरगा, जि.उस्मानाबाद) या रस्त्याचा रस्ते विकास योजना २००१ ते २०२१ अंतर्गत अंतर्भाव करण्याबाबत**

**(१३) * २६१५६ श्री.ज्ञानराज चौगुले (उमरगा) :** सन्माननीय **सार्वजनिक बांधकाम (सार्वजनिक उपक्रम वगळून) मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) उमरगा-कोरेगाववाडी (दंडाची वाट) (ता.उमरगा, जि.उस्मानाबाद) या रस्त्याची लांबी ४ कि.मी. असूनही यास कुठलाही दर्जा नसल्याने सदर रस्त्याच्या सुधारणेचे

काम कोणत्याही योजनेतून पुर्ण करण्यास गैरसोय होत असल्याबाबत व सदर रस्त्याचा रस्ते विकास योजना २००१ ते २०२१ अंतर्गत अंतर्भाव करुन यास दर्जा किंवा क्रमांक देणेबाबत स्थानिक लोकप्रतिनिधी, उमरगा-लोहारा यांनी अधिक्षक अभियंता, सार्वजनिक बांधकाम, उस्मानाबाद यांना दिनांक २१ ऑक्टोबर, २०१३ रोजी वा त्यासुमारास लेखी पत्राव्दारे सुचित केले होते, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, उक्त निवेदनाच्या अनुषंगाने कोणती कार्यवाही केली आहे,
(३) नसल्यास, विलंबाची सर्वसाधारण कारणे काय आहेत तसेच उक्त प्रकरणी केव्हापर्यंत कार्यवाही होणे अपेक्षित आहे ?

**श्री. चंद्रकांत पाटील :** (१) होय, हे खरे आहे.
(२) व (३) शासनाने वीस वर्षीय रस्ते विकास योजना २००१-२०२१ दिनांक २४ एप्रिल, २०१२ च्या शासन निर्णयान्वये मंजूर केली आहे. सदर योजनेत नवीन रस्ते समाविष्ट करणे, रस्ते दर्जोन्नत/दर्जावनत करण्याबाबतचे प्रस्ताव योजनेच्या पुनर्विलोकनाच्यावेळी विचारात घेतले जाणार आहेत. तथापि क्षेत्रिय अधिकाऱ्यांकडून अद्याप शासनाकडे सदरचा प्रस्ताव प्राप्त झालेला नाही.

-----------------

**अल्ट्राटेक सिमेंट कंपनीकरिता मौजा तारसा (जि.नागपूर) येथील शेतक-यांना फसवून भूसंपादन करण्यात आल्याबाबत**

**(१४) * २५८१४ श्री.डि मल्लीकार्जून रेड्डी (रामटेक) :** सन्माननीय **उद्योग मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) मौजा नवेगाव आष्टी (ता.रामटेक, जि.नागपूर) येथे आदित्य बिर्ला ग्रुपद्वारे अल्ट्राटेक सिमेंट कंपनी सुरु करण्याकरिता मौजा तारसा येथे तत्कालीन शासनाने भूसंपादन कायद्याचे उल्लंघन करुन शेतकऱ्यांची फसवणूक करुन जमिन संपादित केल्याचे माहे मे, २०१५ मध्ये वा त्या सुमारास निदर्शनास आले, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, या प्रकरणाची शासनाने चौकशी केली आहे काय, त्यात काय आढळून आले व चौकशीनुसार संबंधित कंपनीवर व त्यांना मदत करणाऱ्या संबंधित अधिकाऱ्यांवर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे तसेच उक्त शेतकऱ्यांना त्यांच्या जमिनीचा योग्य मोबदला दिला आहे काय,
(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**(उत्तर आले नाही.)**

-----------------

**राष्ट्रीय महामार्गावरील पेण खारपाडा येथील टोलवसुली बंद करण्याबाबत**

**(१५) * १७४२९ श्री.अमिन पटेल (मुंबादेवी), श्री.अस्लम शेख (मालाड पश्चिम), श्री.नसीम खान (चांदिवली), श्री.संग्राम थोपटे (भोर) :** सन्माननीय **सार्वजनिक बांधकाम (सार्वजनिक उपक्रम वगळून) मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राष्ट्रीय महामार्गावरील पेण खारपाडा येथील पाताळगंगा नदीवरील बीओटी तत्वावर बांधलेल्या खारपाडा पुलावर सन १९९९ ते २७ ऑगस्ट, २०१५ या सोळा वर्ष सहा महिन्यात आयआरबी कंत्राटदार कंपनीला पुलासाठी ३३.३३ कोटी इतका खर्च आला मात्र या खर्चाच्या चारपट म्हणजे १२० कोटी टोल वसुली मिळणार असल्याचे माहे एप्रिल, २०१५ मध्ये वा त्या दरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, येथील टोलवसुली बंद करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. चंद्रकांत पाटील :** (१) व (२) नाही.

केंद्रशासनाच्या दि.१३.०७.१९९९ च्या अधिसुचनेनुसार सवलत कालावधी १७ वर्षे ९ महिने इतका नेमून देण्यात आला असून दि. २८.०८.२०१५ रोजी संपत आहे. या तारखेपासून टोल बंद करण्याचा आदेश काढण्यासाठी केंद्रशासनाला दि. २९.०६.२०१५ प्रस्ताव सादर केला आहे.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

----------------

**मुंबई - अहमदाबाद राष्ट्रीय महामार्गावरील अपघात रोखण्याबाबत**

**(१६) * २४१७८ श्री.आसिफ शेख (मालेगांव मध्य), श्री.नसीम खान (चांदिवली), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी), श्री.अस्लम शेख (मालाड पश्चिम), श्री.अब्दुल सत्तार (सिल्लोड), ॲड.यशोमती ठाकूर (सोनावणे) (तिवसा) :** सन्माननीय **सार्वजनिक बांधकाम (सार्वजनिक उपक्रम वगळून) मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) पालघर जिल्ह्यातील वसई विरार भागात मुंबई - अहमदाबाद राष्ट्रीय महामार्गावर रस्त्यांच्या कामात नियोजन नसल्याने अनेक छोटया मोठ्या चुकांमुळे व रात्रीच्या वेळेस महामार्गावरील पथदिवे बंद असल्याने अतिवेगाने जाणाऱ्या वाहनांमुळे अपघात होत असल्याचे माहे मे, २०१५ मध्ये निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, याबाबत शासनाकडून कार्यवाही करण्यात यावी यासाठी स्थानिक संघटनांनी दि.११ मे, २०१५ रोजी पालघर जिल्हाधिकारी कार्यालयासमोर धरणे आंदोलन केले, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, या भागातील रस्ते अपघात रोखण्यासाठी कोणती कार्यवाही करण्यात आली वा येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. चंद्रकांत पाटील :** (१) अंशत: खरे आहे.
(२) होय.
(३) सुरक्षिततेच्या दृष्टीने सूचनाफलक, ब्लिंकर्स व अन्य उपाययोजना करण्यात आलेल्या आहेत.
(४) प्रश्न उद्‍भवत नाही.

-----------------

**राष्ट्रीयकृत बँकानी शेतकऱ्यांना पीक कर्ज**
**देण्यास नकार दिल्याबाबत**

**(१७) * १७०६९ श्री.सुनिल केदार (सावनेर), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी), श्री.बाबुराव पाचर्णे (शिरुर), श्री.हसन मुश्रीफ (कागल), श्री.भास्कर जाधव (गुहागर), श्री.जितेंद्र आव्हाड (मुंब्रा कळवा), श्री.जयंत पाटील (इस्लामपूर) :** सन्माननीय **सहकार मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) जळगांव जिल्हयात राष्ट्रीयकृत बँकांनी शेतक-यांना पीक कर्ज देण्यास नकार दिला असल्याची बाब मे, २०१५ मध्ये वा त्या दरम्यान निदर्शनास आली, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, राज्यातील शेतकऱ्यांना नव्याने पीक कर्ज देताना जुन्या कर्जाचे पुर्नगठन करण्याबाबत मा.महसूल मंत्री व अप्पर मुख्य सचिव (मदत व पुर्नवसन) यांना पत्र दिले, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, जळगाव जिल्हयात जिल्हा अग्रणी बँकेने दिलेल्या माहितीनुसार सन २०१४-१५ मध्ये जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकेसह ग्रामीण व राष्ट्रीयकृत बँकांच्या माध्यमातून शेतक-यांना सुमारे २१५१ कोटी रुपये पीक कर्ज वाटपाचे उद्दिष्ट देण्यात आले होते, हे खरे आहे काय,
(४) असल्यास, उक्त उद्दिष्टापैकी जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकेने आपले ९९ टक्के उद्दिष्ट पूर्ण केले असताना १० राष्ट्रीयकृत बँकांनी वर्षभरात १ रुपयाचेही पीक कर्ज वाटप केले नाही, हे खरे आहे काय,

(५) असल्यास, बँकांनी शेतक-यांऐवजी व्यापाऱ्यांना प्राधान्य दिल्याने त्यांच्या क्षेत्रातील शेतक-यांना भांडवली व्यवस्थेसाठी खाजगी सावकाराकडून जास्त व्याजदराने पैसे घ्यावे लागले, हे खरे आहे काय, असल्यास, अशाप्रकारची पुनरावृत्ती टाळण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली आहे वा करण्यात येत आहे नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. चंद्रकांत पाटील :** (१) व (२) हे खरे नाही.

जिल्हयात शासन निर्णयानुसार पुनर्गठणाचे आदेश सर्व बँकांना देण्यात आले आहेत. त्यानुसार आवश्यक कर्जाचे पूनर्गठन केले जात आहे.

जळगांव जिल्हयात एकूण ३८९६ सभासद शेतकऱ्यांचे रु. ४३.५८ कोटी इतक्या रक्कमेचे पुनर्गठन करण्यात आले आहे.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

(५) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## लोटे (ता.खेड, जि.रत्नागिरी) औद्योगिक वसाहतीतील रिव्हरसाईड या रासायनिक कंपनीत स्फोट झाल्याबाबत

**(१८) * २६२४० श्री.भास्कर जाधव (गुहागर), श्री.रमेश कदम (मोहोळ), श्री.जितेंद्र आव्हाड (मुंब्रा कळवा), श्री.सदानंद चव्हाण (चिपळूण) :** सन्माननीय **कामगार मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) लोटे (ता.खेड, जि.रत्नागिरी) औद्योगिक वसाहतीतील रिव्हरसाईड या रासायनिक कंपनीत दिनांक ८ जून, २०१५ रोजी स्फोट होवून दोन कामगार गंभीररित्या जखमी झाले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, स्फोटानंतर रसायनयुक्त काळ्या धुरामुळे आवाशी गावातील रहिवाशांना श्वसनाचा त्रास होवू लागला, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, हा स्फोट कंपनी व्यवस्थापनाच्या हलगर्जीपणामुळे झाला, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, उक्त बाबतीत कारखान्यावर शासनाकडून कोणती कार्यवाही करण्यात आली वा येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. प्रकाश मेहता :** (१) लोटे परशुराम एम.आय.डी.सी., ता.खेड, जि.रत्नागिरी येथील रिव्हरसाईड इंडस्ट्रिज लिमिटेड या डाईज बनविणाऱ्या कारखान्यात दिनांक ०८ जून, २०१५ रोजी स्फोट झाला, हे खरे आहे. तथापि, सदर स्फोटामध्ये कोणीही कामगार जखमी झालेला नाही.

(२) स्फोटानंतर रसायनयुक्त वायू व वाफा वातावरणात पसरल्या, ही वस्तुस्थिती आहे.

(३) त्या संदर्भात चौकशी केली असता कारखाना व्यवस्थापनाच्या निष्काळजीपणामुळे सदर घटना घडल्याचे निदर्शनास आले, अशी वस्तुस्थिती आहे.

(४) व (५) याप्रकरणी भोगवटादारास कारखाने अधिनियम, १९४८ च्या कलम ७-अे (२) (अे) च्या भंगाबाबत कारणे दाखवा नोटीस दिलेली असून त्या अनुषंगाने पुढील कार्यवाही चालू आहे.

तसेच कारखान्याचे व्यवस्थापक व प्लँट इनचार्ज यांचेविरुध्द पोलीस खात्यामार्फत भा.दं.वि. अंतर्गत गुन्हा दाखल करण्याची कार्यवाही सुरु आहे.

-----------------

## चंद्रपूर एम.आय.डी.सी. परिसरातील उद्योग बंद पडल्याबाबत

**(१९) * २३४१३ श्री.विजय वडेट्टीवार (ब्रम्हपूरी), श्री.नानाजी शामकुळे (चंद्रपूर) :** सन्माननीय **उद्योग मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) चंद्रपूर एम.आय.डी.सी. परिसरातील धारावी पॉवर ॲन्ड इन्फ्रास्ट्रक्चर, सिदाबली इस्पात, चामन मेटीलीक, ग्रेस इंडस्ट्रिज, गोपाल आर्यन ॲन्ड स्टिल, गुप्ता पावर, राजोली स्टिल या मोठया उद्योगासह अनेक उद्योग बंद पडलेले आहेत, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उद्योग बंद पडल्यामुळे हजारो कामगारासह कुटुंबावर उपासमारीची वेळ आलेली आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, चंद्रपूर येथील मोठया प्रमाणात उद्योग बंद पडण्याची कारणे काय आहेत,

(४) असल्यास, सदर उद्योग पुन्हा सुरु होण्यासाठी तसेच हजारो कामगारांचे पुनर्वसन करण्यासाठी किंवा त्यांना रोजगार उपलब्ध होण्यासाठी शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. सुभाष देसाई :** (१) हे अंशतः खरे आहे.

१. धारावी पॉवर ॲन्ड इन्फास्ट्रक्चर व गुप्ता मेटॅलिक ॲन्ड पॉवर या घटकाचा विज खरेदी करारनामा न झाल्याने घटक सुरु झाला नाही.

२. सिध्दबली इस्पात व गोपानी आयर्न, एमआयडीसी, चंद्रपूर या घटकाने चाचणी उत्पादन सुरु केले आहे.

३. चामन मेटीलीक प्रा.लि.एमआयडीसी, चंद्रपूर हा घटक उत्पादन खर्च वाढल्यामूळे बंद पडला आहे.

४. ग्रेस इंडस्ट्रीज, एमआयडीसी, चंद्रपूर या घटकास केंद्र शासनाची पर्यावरण विषयक परवानगी न मिळाल्याने घटक सुरु झाला नाही.

५. राजोली स्टिल ता.मुल एमआयडीसी जि.चंद्रपूर या घटकाने चाचणी उत्पादन सुरु केले आहे.

(२) सन २००८ च्या औद्योगिक प्रगणनेनुसार MIDC क्षेत्रातील ६६ उद्योग घटक बंद आढळून आले आहेत. त्यात ६५९ कामगार परिणामित झाले आहेत.

(३) सन २००८ साली केलेल्या लघु उद्योगांच्या चौथ्या प्रगणने दरम्यान उद्योग बंद असण्याची सर्वसाधारण कारणे खालील प्रमाणे आहेत.

१. उत्पादनास मागणी कमी असणे.

२. खेळत्या भांडवलाची कमतरता.

३. व्यवस्थापनातील अडचणी .

४. कच्च्या मालाची अनुपलब्धता इ.

(४) शासनाने उद्यागांच्या पुनरुज्जीवनासाठी योजना जाहिर केली असून, आजारी उद्योगांनी सर्व शासकीय देणी ६० मासिक हप्त्यांमध्ये व ७ % या सवलतीच्या वार्षिक व्याजाने परतफेड करायची आहे. या योजनेंतर्गत ११ लघु उद्योगांना आजारी उद्योग प्रमाणपत्र देण्यात आले आहेत.

(५) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## सार्वजनिक बांधकाम विभाग, परभणी येथे पाच कोटी रुपयांची बोगस बिले काढण्यात आल्याबाबत

**(२०) * १७४६० डॉ.संतोष टारफे (कळमनुरी), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी), प्रा.वर्षा गायकवाड (धारावी), प्रा.विरेंद्र जगताप (धामणगाव रेल्वे), श्रीमती निर्मला गावित (इगतपूरी), श्री.संदीपानराव भुमरे (पैठण) :** सन्माननीय **सार्वजनिक बांधकाम (सार्वजनिक उपक्रम वगळून) मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) परभणी येथील सार्वजनिक बांधकाम विभागात ३०५४ एस.आर.टू.रोड या

हेडअंतर्गत मिळालेला निधी ३०५४ सी.आर.टू.रोड या हेडखाली काम केल्याचे दाखवून पाच कोटी रुपयांची बोगस बिले काढल्याबाबत नागपूरच्या महालेखापालाच्या तपासणी पथकाने आक्षेप नोंदविल्याचे माहे मे, २०१५ मध्ये वा त्या दरम्यान निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, याबाबत चौकशी केली आहे काय,

(३) असल्यास, चौकशीत काय आढळून आले व पाच कोटी रुपयांची बोगस बिले काढणाऱ्या अधिकारी व कर्मचाऱ्यांवर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. चंद्रकांत पाटील :** (१) अंशत: खरे आहे. दि.१५.४.२०१४ रोजी महालेखापाल, नागपूर यांच्या पथकाने सा.बां. विभाग, परभणी यांच्या वार्षिक तपासणी दरम्यान Audit Memo उपस्थित करुन हेड बदल करुन खर्च केला या मुद्यांसंबंधाने अधिक खुलासा/स्पष्टीकरण सादर करण्याबाबत निर्देश दिले आहेत.

(२) व (३) याबाबत मुख्य अभियंता, सार्वजनिक बांधकाम प्रादेशिक विभाग, औरंगाबाद यांना चौकशी करुन अहवाल देण्याबाबत निर्देश देण्यात आलेले आहेत. चौकशी अहवाल प्राप्त झाल्यावर पुढील कार्यवाही करण्यात येईल.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## शेणसरी गावातील (ता.डहाणू, जि.पालघर) आरोग्य केंद्राचे बांधकामात ठेकेदार व शाखा अभियंता यांनी केलेला गैरव्यवहार

**(२१) * २५७९१ श्री.पास्कल धनारे (डहाणू) :** सन्माननीय **सार्वजनिक आरोग्य आणि कुटुंब कल्याण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) शेणसरी गावातील (ता.डहाणू, जि.पालघर) आरोग्य केंद्राचे बांधकाम करताना वाळू, खडी, स्टील निकृष्ट दर्जाचे वापरुन ठेकेदार व शाखा अभियंता यांनी गैरव्यवहार केल्याचे दिनांक ०५ मे, २०१५ रोजी निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले,

(३) असल्यास, सदर प्रकरणी ठेकेदार व शाखा अभियंता यांच्यावर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**डॉ. दीपक सावंत :** (१) हे खरे नाही.

(२) होय, सदर बांधकामावर गुणवत्ता व सनियंत्रण करिता थर्ड पार्टी कन्सलटंट म्हणून टाटा प्रोजेक्ट लि. यांची नियुक्ती करण्यात आलेली आहे. स्लॅब कास्टींग, मेजर कॉक्रीटींग ही सर्व कामे थर्ड पार्टी कन्सलटंट यांच्या उपस्थितीत केली जातात. तसेच मानकाप्रमाणे आणि करारनाम्यातील तरतुदीप्रमाणे सर्व बांधकाम साहित्याच्या गुणवत्ता चाचण्या घेण्यात आल्या आहेत. सद्यस्थितीत दुसऱ्या स्लॅबची तयारी सुरु आहे.

(३) व (४) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

**अचलपूर व चांदूरबाजार तालुक्यातील रेडवा परसोडा (चारगड) बेसखेडा परसोडा या तांडावस्तीतील कामांकरिता निधी उपलब्ध करण्याबाबत**

**(२२) * २०४४४ श्री.ओमप्रकाश ऊर्फ बच्चू कडू (अचलपूर), श्री.गणपत गायकवाड (कल्याण पूर्व) :** सन्माननीय **सामाजिक न्याय मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) अचलपूर व चांदूर बाजार तालुक्यातील रेडवा परसोडा (चारगड) बेसखेडा परसोडा या तांडावस्तीतील कामांकरिता १० ते १५ लक्ष रु. निधी उपलब्ध करण्याबाबत स्थानिक लोकप्रतिनिधी, अचलपूर यांनी दिनांक २८ मे, २०१५ रोजी शासनाकडे मागणी केली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. राजकुमार बडोले :** (१) होय.

(२) वसंतराव नाईक तांडा वस्ती सुधार योजनेअंतर्गत २०१४-१५ मध्ये अमरावती जिल्हयाकरीता रु.२२०.०० लक्ष तरतुद प्राप्त झालेली होती. सदर तरतुदीचे अनुषंगाने जिल्हयातील संबंधित सर्व पंचायत समितीकडून तांडावस्ती सुधार योजनेअंतर्गतच्या कामांचे प्रस्ताव मागणी करण्यात आलेले होते. त्यानुसार एकूण ११७ प्रस्ताव प्राप्त झालेले होते त्यापैकी ४७ प्रस्तावांना उपलब्ध निधीच्या व मागणीच्या अनुषंगाने जिल्हास्तरीय समितीने मंजुरी दिलेली आहे.

चांदुर बाजार तालुक्यातील ब्राम्हणवाडा पाठक, बेलमंडळी, बोरगांव मोहना, सर्फाबाद, तुळजापुर गढी एवढे प्रस्ताव पंचायत समितीकडून प्राप्त झाले होते व त्यास निधीचे उपलब्धतेनुसार निधी मंजुर करण्यात आलेला आहे. अचलपूर तालुक्यातील एकही प्रस्ताव प्राप्त न झाल्याने त्यासाठी निधी उपलब्ध करुन देण्याचा प्रश्न उद्भवत नाही.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

**राज्यातील आदिवासी आश्रमशाळांमधील विद्यार्थ्यांसाठी**
**वॉश योजना राबविण्याबाबत**

**(२३) * २४७३९ श्री.प्रशांत बंब (गंगापूर), श्री.अनिल बाबर (खानापूर), श्री.बसवराज पाटील (औसा), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी) :** सन्माननीय **आदिवासी विकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) महाराष्ट्र राज्यातील आदिवासी आश्रमशाळामधील विद्यार्थ्यांचे आरोग्य निरोगी राहण्यासाठी वॉटर, सॅनिटेशन अँड हायजिन अर्थात वॉश योजना राबविण्याचा निर्णय घेउन नाविन्यपूर्ण योजनेतून अडिचशे कोटी रुपयाची तरतुद केली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर आदिवासी आश्रमशाळासाठी वॉश योजनेचे सर्वसाधारण स्वरूप काय आहे व हि योजना केव्हापर्यंत राबविण्यात येणार आहे,

(३) असल्यास, सदर योजना राबवितांना शासकीय व खाजगी संस्था चालवित असणा-या शाळेतही यंत्र लावणार काय, तसेच त्याचे निकष कसे ठरविले व उक्त यंत्र लावण्याची जबाबदारी कोणत्या विभागाकडे देणार वा कंत्राटदारांचे माध्यमातून राबविण्यात येणार आहे काय,

(४) तसेच उक्त बाबतीत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. विष्णु सवरा :** (१) हे, अंशत: खरे आहे.

आदिवासी विकास विभागाच्या अखत्यारीतील शासकीय/अनुदानित आश्रमशाळा व शासकीय वसतीगृहांमधील विद्यार्थ्यांचे आरोग्य निरोगी राहण्यासाठी वॉटर, सॅनिटेशन अँड हायजिन (वॉश) ही, योजना शासन निर्णय क्रमांक-शाआशा-२०१५/ प्र.क्र.५२/का.१३ दिनांक ११ मार्च, २०१५ अन्वये राबविण्याचा निर्णय घेण्यात आला आहे. सदर कार्यक्रम युनिसेफच्या सहकार्याने सुरु केलेला असुन उद्याप या योजनेकरीता आर्थिक तरतूद केलेली नाही.

(२) वॉश योजनेचे स्वरुप खालील प्रमाणे:-

१. आश्रमशाळांमधील विद्यार्थ्यांमध्ये पाणी, स्वच्छता आणि आरोग्य (वॉश) याबाबत जागरुकता निर्माण करणे.

२. आश्रमशाळांमधील विद्यार्थ्यांच्या व्यवहारामध्ये व आचरणामध्ये प्रशिक्षणाद्वारे तसेच पुरेश्या प्रमाणात भौतिक सुविधा उपलब्ध करुन सकारात्मक बदल घडवून आणणे.

३. आश्रमशाळांमध्ये पाणी, स्वच्छता आणि आरोग्याच्या किमान भौतिक सुविधांसाठी एक बेंचमार्क निश्चित करणे. या बेंचमार्कच्या आधारे उपलब्ध असलेल्या सुविधांमध्ये सुधारणा करणे व नवीन सुविधा निर्माण करणे.

४. पाणी, स्वच्छता आणि आरोग्य (वॉश) कार्यक्रम नियमितपणे सुरळीत चालू राहण्यासाठी उपलब्ध सुविधांच्या देखभाल व दुरुस्तीसाठी मार्गदर्शिका तयार करणे.

५. आश्रमशाळांमध्ये पाणी, स्वच्छता आणि आरोग्य (वॉश) या विषयाला प्राधान्य देवून आदिवासी विकास विभागातील सर्व अधिकारी, कर्मचारी आणि संबंधितांमध्ये कार्यक्रमाबद्दल जागरुकता, संवेदनशीलता व आवड निर्माण करणे.

सदर योजनेंतर्गत मार्च-२०१६ पर्यंत सर्व आश्रमशाळांमध्ये वॉश सुविधांची पुर्तता करण्याचे प्रस्तावित असून विद्यार्थी व शिक्षकांची जनजागृती तसेच निर्माण सुविधांचे व्यवस्थापन त्यापुढेही सुरु राहणार आहे.

(३) वॉटर, सॅनिटेशन अँड हायजिन (वॉश) हा विद्यार्थ्यांच्या व्यवहारामध्ये व आचरणामध्ये प्रशिक्षणाद्वारे तसेच पुरेश्या प्रमाणात भौतिक सुविधा उपलब्ध करुन सकारात्मक बदल घडवून आणण्याबाबतचा एक उपक्रम आहे. सदर उपक्रमातंर्गत शासकीय आश्रमशाळा व खाजगी संस्था चालवित असणाऱ्या आश्रमशाळेत कोणत्याही प्रकारची यंत्रे लावण्यात येणार नाहीत. त्यामुळे यंत्र लावण्याची जबाबदारी एखाद्या विभागाकडे वा कंत्राटदाराच्या माध्यमातुन राबविण्याचा प्रश्न उद्भवत नाही.

(४) वॉटर, सॅनिटेशन अँड हायजिन (वॉश) या योजनेंतर्गत ५१४ शासकिय आश्रमशाळांचे युनिसेफने, मुख्य संसाधन केंद्राचे (KRC-Key Resources Center) मदतीने सर्वेक्षण पूर्ण केले असुन सोयी सुविधांच्या आधारे आश्रमशाळांचे शुन्य, एक, दोन व तीन तारांकित याप्रमाणे वर्गीकरण केलेले आहे. त्यानुसार प्रत्येक आश्रमशाळा निहाय वॉश सुविधा पुर्ततेचा आराखडा तयार करण्याची कार्यवाही सुरु आहे.

(५) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## कोल्हापूर-सांगली रस्त्याचे चौपदरीकरण तसेच हातकणंगले येथील उड्डाणपुलाच्या कामाबाबत

**(२४) * २३२३१ श्री.सुरेश हाळवणकर (इचलकरंजी) :** सन्माननीय **सार्वजनिक बांधकाम (सार्वजनिक उपक्रम वगळून) मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) कोल्हापूर-सांगली रस्त्याच्या चौपदरीकरणाचे काम ठेकेदार कंपनीच्या उचित नियोजनाअभावी प्रलंबित असून गेल्या ४ वर्षांत केवळ ५० टक्के काम पूर्ण झाले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, प्रकल्पासाठी सुमारे ५५ हेक्टर जमीन संपादन करण्याचे काम महसूल विभागाकडून जबाबदारीने पूर्ण न झाल्यामुळे नुकसान भरपाईच्या रक्कमेत ८० कोटीं रुपयांची वाढ झाली, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, सदर काम पूर्ण करण्यास सार्वजनिक बांधकाम मंत्री यांनी कंपनीस दिनांक ३१ मे, २०१५ पर्यंतची अंतरिम मुदत दिली होती, हे ही खरी आहे काय,

(४) तसेच हातकणंगले येथील उड्डाणपुलाला सार्वजनिक बांधकाम विभागाची प्रशासकीय मान्यता नसतानाही कंपनीने काम सुरु केले, हे खरे आहे काय,

(५) असल्यास, उक्त बाबतीत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे, नसल्यास विलंबाची कारणे कोणती ?

**श्री. चंद्रकांत पाटील :** (१) होय, अंशतः खरे आहे.

या प्रकल्पाचे कार्यारंभ आदेश दिल्यापासून पावणेतीन वर्षात जवळपास ५२% काम पुर्ण झाले आहे.

(२) हे खरे नाही.

(३) हे खरे नाही.

(४) व (५) नाही.

मंजूर निविदेप्रमाणे हातकणंगले येथे २२.२५ मीटर लांबीचा उड्डाणपूल बांधणे प्रस्तावित होते. तथापि, आता लोकप्रतिनिधी व स्थानिक जनतेच्या मागणीनुसार जास्त लांबीचा उड्डाणपुल विचाराधीन आहे व त्या प्रस्तावाची छाननी प्रगतीपथावर आहे. उद्योजकाने सुरु केलेले काम त्याने थांबविले असून सुधारित प्रस्तावाच्या मान्यतेनुसार काम सुरु करण्याचे प्रस्तावित आहे.

-----------------

**पनवेल (जि.रायगड) येथील उद्योगक्षेत्रात गुंतवणूक करण्याबाबत**

**(२५) * १८१२९ श्री.अजित पवार (बारामती), श्री.राहुल जगताप (श्रीगोंदा), श्री.जितेंद्र आव्हाड (मुंब्रा कळवा), श्री.वैभव पिचड (अकोले), श्री. शामराव उर्फ बाळासाहेब पाटील (कराड उत्तर), श्री.अवधूत तटकरे (श्रीवर्धन), श्री.पांडुरंग बरोरा (शहापूर), श्री.शशिकांत शिंदे (कोरेगाव), श्री.राणाजगजीतसिंह पाटील (उस्मानाबाद), श्री.भास्कर जाधव (गुहागर), श्री.सुरेश लाड (कर्जत), श्री.राहुल मोटे (परांडा), श्री.मकरंद जाधव-पाटील (वाई), श्री.हनुमंत डोळस (माळशिरस), श्रीमती सुमन पाटील (तासगाव - कवठेमहांकाळ), श्री.रमेश कदम (मोहोळ), श्री.किसन कथोरे (मुरबाड), श्री.संदीप नाईक (ऐरोली), श्री.गणपत गायकवाड (कल्याण पूर्व), डॉ.सुधाकर भालेराव (उदगीर) :** सन्माननीय **उद्योग मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) रायगड जिल्ह्यातील पनवेल हा केंद्रबिंदू मानून या शहर व परिसराच्या विकासासाठी उद्योग क्षेत्रात एक लक्ष कोटी रुपयांची गुंतवणूक करण्याचा प्रस्ताव शासनाच्या विचाराधीन आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, पनवेल शहर व आजुबाजुच्या परिसरात उद्योगाच्या दृष्टीने कोणत्या योजना/ कामे हाती घेण्यात येणार आहेत तसेच त्यानुसार योजना व कामाचा आराखडा तयार करण्यात आला आहे काय,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. सुभाष देसाई :** (१) नाही.

(२) प्रश्न उद्भवत नाही.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

**किनवट तालुक्यातील (जि.नांदेड) मानसिंग नाईक तांडा (तोटंबा) येथील शाळेच्या विकास निधीत करण्यात आलेला गैरव्यवहार**

**(२६) * २५८१९ श्री.अब्दुल सत्तार (सिल्लोड), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी) :** सन्माननीय **शालेय शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) किनवट तालुक्यातील (जि.नांदेड) मानसिंग नाईक तांडा (तोटंबा) येथील शाळेच्या विकासासाठी सन २००५ ते २०१५ या दरम्यान १७ लाख १२ हजार ९२६ रुपयांचा निधी प्राप्त झाला होता, त्या निधीचा योग्य विनियोग न करता त्या निधीत परस्पर अपहार केल्याच्या आरोपावरुन १७ जणांविरुध्द इस्लामपूर पोलीस ठाण्यात गुन्हा नोंदविण्यात आल्याचे माहे एप्रिल २०१५ मध्ये वा त्यासुमारास निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त अपहारा प्रकरणी शासनाने चौकशी करुन संबंधित दोषींवर पुढे कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,
(३)  नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. विनोद तावडे :** (१) व (२) शासनाच्या विविध योजनांकरिता प्राप्त निधीमध्ये रु.१,६२,३३४/- इतक्या रकमेचा अपहार केल्याप्रकरणी सदर शाळेच्या मुख्याध्यापकास निलंबित करण्यात आले असून त्यांचेविरुध्द विभागीय चौकशी प्रस्तावित करण्यात आली आहे.
(३) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

**करंबवणे व खेर्डी (ता.चिपळूण, जि.रत्नागिरी) येथील शेतकऱ्यांची जमीन संपादित केल्याबाबत**

**(२७) * २६३०७ श्री.सदानंद चव्हाण (चिपळूण) :** सन्माननीय **उद्योग मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) करंबवणे (ता.चिपळूण, जि.रत्नागिरी) येथे सुमारे ४० ते ४५ वर्षापूर्वी स्थानिक शेतकऱ्यांची शेकडो एकर जमिन टाटा ऑईल मिल उद्योग उभारणीच्या प्रयोजनासाठी संपादीत केली आहे हे खरे आहे काय, तसेच सदर ठिकाणी प्रस्तावित ऑईल मिल अद्याप अस्तित्वात आलेली नसून विनावापर पडून असलेली जमिन मूळ मालकांना सरकारी दराने परत मिळणेबाबत स्थानिक लोकप्रतिनिधींनी मा.उद्योग मंत्री यांना दिनांक ९ एप्रिल, २०१५ रोजी निवेदन देऊन विनंती केली आहे, हे खरे आहे काय,
(२) तसेच खेर्डी (ता.चिपळूण, जि.रत्नागिरी) येथील खेर्डी शिगवणवाडीतील शेतकऱ्यांच्या जमिनी औद्योगिक वसाहतीकरीता संपादीत करण्यात आलेल्या आहेत, हे खरे आहे काय,
(३) असल्यास, उक्त संपादनामुळे प्रकल्पग्रस्त झालेल्या खेर्डी शिगवणवाडी येथील शेतकऱ्यांना पाणी योजना स्वतंत्रपणे व अल्पदराने मिळणेबाबत स्थानिक लोकप्रतिनिधींनी मा.उद्योग मंत्री व मुख्य कार्यकारी अधिकारी, म.औ.वि. महामंडळ, मुंबई यांना दिनांक १० जून, २०१५ रोजी निवेदन दिले, हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, प्रश्न बाब १, २, ३ च्या अनुषंगाने शासनाने काय कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. सुभाष देसाई :** (१) मौजे करंबवणे, ता. चिपळूण, जि. रत्नागिरी येथे १९७२ साली टाटा ऑईल मिल या कंपनीने उद्योग उभारणीसाठी ४५.२४ हे.आर क्षेत्र खाजगीरित्या विकत घेतले आहे. त्यामुळे सदर जमीन या टाटा कंपनीने खरेदी केल्या आहेत. तसेच या जमिनी सरकारी दराने परत मिळण्यासंदर्भात स्थानिक लोकप्रतिनिधी यांनी विनंती कली आहे.

(२) महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळाने सन -१९६३ मध्ये खेर्डी येथील ८१.०० हे.आर क्षेत्र संपादित केलेले आहे.

(३) होय, हे खरे आहे.

(४) मौजे करंबवणे येथील जमिन टाटा ऑइल मिल यांनी स्वत: खरेदी केली असल्यामुळे सदर जमिन परत करण्याचा प्रश्न उद्भवत नाही. तथापि बाब क्रमांक २ व ३ बाबत महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळाकडून मौजे खेंडी शिगवण येथील जमिनीचे संपादन करुन तेथे भूखंड आरेखित करुन भूखंड वाटपाची प्रक्रिया पूर्ण झालेली आहे व खेंडी - शिगणवाडी येथील शेतकऱ्यांसाठी पाणी योजना राबविण्याबाबतची कार्यवाही सुरु आहे.

(५) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

### चंद्रपूर जिल्ह्यातील सि.डी.सी.सी बँकेत नोकर भरतीमध्ये झालेला गैरव्यवहार

**(२८) * २६४०८ ॲड.संजय धोटे (राजूरा) :** सन्माननीय **सहकार मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) चंद्रपूर जिल्ह्यातील सि.डी.सी.सी बँकेत सन २०१२-१३ व २०१३-१४ या दोन वर्षात राष्ट्रीय कृषी व ग्रामीण विकास बँकेने (नाबार्ड) जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकेची आर्थिक पहाणी करताना बँकेच्या नोकर भरतीमध्ये कोट्यवधीचा गैरव्यवहार, अनियमीत कर्ज वाटप झाल्याचे निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त प्रकरणी सखोल चौकशी करण्याचे आदेश मा.सहकार मंत्री यांनी दिले आहे, हे खरे आहे काय,

(३) असल्यास, उपरोक्त प्रकरणी चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले तसेच संबधितांवर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. चंद्रकांत पाटील :** (१) बँकेच्या नोकरभरती मध्ये गैरव्यवहार झाल्याचे निदर्शनास आलेले नाही. तथापि, कर्जवाटप प्रकरणी अनियमितता आढळून आली आहे.

(२) हे खरे नाही.

बँकेतील नोकरभरती प्रकरणी तक्रारी प्राप्त झाल्यामुळे नोकरभरती प्रकीयेस तात्पुरती स्थगिती देण्यात आली होती. याप्रकरणी चौकशी करुन अहवाल सादर करण्याबाबत जिल्हा उपनिबंधक, सहकारी संस्था, चंद्रपूर यांना निर्देशित करण्यात आलेले होते.

(३) बँकेच्या नोकरभरती प्रकरणी चौकशी अहवाल प्राप्त झाला असून तक्रारी मध्ये तथ्य आढळून आले नाही. तथापि कर्ज वाटप प्रकरणी अनियमितता आढळून आल्यामुळे महाराष्ट्र सहकारी संस्था अधिनियम, १९६० च्या कलम ८३ अन्वये चौकशी प्रस्तावीत करण्यात आली आहे.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

**बेलोरा - धामक (जि.यवतमाळ) या रस्त्यावरील**
**ॲप्रोचचे काम पूर्ण करण्याबाबत**

**(२९) * १७०१३ प्रा.विरेंद्र जगताप (धामणगाव रेल्वे), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी), ॲड.यशोमती ठाकूर (सोनावणे) (तिवसा) :** सन्माननीय **जलसंपदा मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) बेलोरा-धामक (जि.यवतमाळ) या रस्त्यावरील पुलाचे काम पुर्ण करण्यात आले असून ॲप्रोचचे काम अद्याप करण्यात आले नसल्यामुळे ॲप्रोचचे काम करण्यासाठी लोकप्रतिनिधी यांनी कार्यकारी अभियंता, बेंबळा प्रकल्प विभाग, यवतमाळ यांना दि.१२ एप्रिल, २०१५ रोजी वा त्यासुमारास लेखी निवेदन दिले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, ॲप्रोचचे काम करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. गिरीष महाजन :** (१) होय.

(२) संबंधीत कंत्राटदारास ॲप्रोच चे काम तातडीने करण्याबाबत दि.०२/०७/२०१५ रोजी कळविले असून काम प्रगतीपथावर आहे.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## महाड औद्योगिक वसाहतीमधील ॲस्टेक लाईफ साईन्सेस कारखान्यातून वायुगळती झाल्याबाबत

**(३०) * १६६१० श्रीमती निर्मला गावित (इगतपूरी), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी), प्रा.वर्षा गायकवाड (धारावी), श्री.नसीम खान (चांदिवली) :** सन्माननीय **कामगार मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) महाड औद्योगिक वसाहतीमधील ॲस्टेक लाईफ साईन्सेस कारखान्यातून दिनांक ५ एप्रिल, २०१५ रोजी झालेल्या वायुगळतीमुळे ९ महिला कर्मचा-यांना त्याची बाधा झाल्याने त्यांना एमएमए रुग्णालयात दाखल करण्यात आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त प्रकरणी अद्यापही पोलिसांकडून कारखाना व्यवस्थापनावर वा कारखाना निरिक्षकांवर कोणतीही कारवाई झालेली नाही, हे खरे आहे काय,

(३) असल्यास, या वायुगळतीसंदर्भात शासनाने चौकशी करुन कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. प्रकाश मेहता :** (१) मे. ॲस्टेक लाईफ सायन्स लि. या कारखान्यात दिनांक ५ एप्रिल, २०१५ रोजी सकाळी ११.४५ वाजताच्या सुमारास वायुगळतीमुळे ८ महिला कामगारांना त्रास झाल्यामुळे एमएमए रुग्णालय, महाड येथे दाखल करण्यात आले होते, अशी वस्तुस्थिती आहे.

(२), (३) व (४) सदर घटनेची चौकशी पोलीस विभाग, महाड एमआयडीसी, महाराष्ट्र प्रदुषण नियंत्रण मंडळ, महाड, औद्योगिक सुरक्षा व आरोग्य संचालनालय, रायगड यांनी केलेली आहे.

तसेच औद्योगिक सुरक्षा व आरोग्य संचालनालय, रायगड यांनी कारखान्याच्या भोगवटादाराविरुध्द कारखाने अधिनियम, १९४८ अंतर्गत मा. मुख्य न्यायदंडाधिकारी अलिबाग यांचे न्यायालयात फौजदारी खटला दाखल केलेला आहे.

-----------------

## सांगली जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकेत झालेला गैरव्यवहार

**(३१) * २४३५३ डॉ.सुजित मिणचेकर (हातकणंगले), श्री.प्रकाश आबिटकर (राधानगरी), श्री.उल्हास पाटील (शिरोळ) :** सन्माननीय **सहकार मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) सांगली जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकेत २००१ ते २०१२ या कालावधीत ४ कोटी

१८ लाखांचा गैरव्यवहार झाल्याचे दिनांक २४ नोव्हेंबर, २०१४ रोजी वा त्या सुमारास चौकशी अधिकारी यांनी सादर केलेल्या अहवालात आढळून आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, या अहवालानुसार किती व्यक्ती दोषी आढळून आले व त्यांचेवर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. चंद्रकांत पाटील :** (१) होय, हे खरे आहे,

चौकशी अधिकारी श्री. एम. एल. माळी, उपनिबंधक यांनी चौकशी करुन आपला अहवाल विभागीय सहनिबंधक, सहकारी संस्था कोल्हापूर यांना दि. २०.११.२०१४ रोजी सादर केला आहे. सदर अहवालात सन २००१ ते २०१२ या कालावधीत तत्कालीन संचालक मंडळाने घेतलेल्या विविध निर्णयामुळे बँकेचे ४ कोटी १८ लाख १६ हजार रुपयांचे नुकसान झाल्याचे नमुद केले आहे.

(२) सदर चौकशी अहवालानुसार दोषी व्यक्तीवर कारवाई करणेसाठी सहकार कायदा कलम ८८ अन्वये दि. १५.१२.२०१४ रोजी विभागीय सहनिबंधक, सहकारी संस्था कोल्हापूर विभाग, कोल्हापूर यांचे दि. १५.१२.२०१४ रोजीचे आदेशाद्वारे श्री. श्रीधर जिल्हा विशेष लेखापरिक्षक, सहकारी संस्था, सांगली (वर्ग -१) यांची चौकशी अधिकारी म्हणून नेमणूक करणेत आलेली असून चौकशीचे कामकाज सुरु केले आहे.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

### ठाणे जिल्ह्यातील कल्याण-बदलापूर राज्य महामार्गाच्या विस्ताराबाबत

**(३२) * १७९४३ श्री.जितेंद्र आव्हाड (मुंब्रा कळवा), श्री.रमेश कदम (मोहोळ), श्री.पांडुरंग बरोरा (शहापूर), श्री.हनुमंत डोळस (माळशिरस), श्री.शशिकांत शिंदे (कोरेगाव), श्री.किसन कथोरे (मुरबाड), श्री.जयंत पाटील (इस्लामपूर), श्री.वैभव पिचड (अकोले), श्री.भास्कर जाधव (गुहागर) :** सन्माननीय **सार्वजनिक बांधकाम (सार्वजनिक उपक्रम वगळून) मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) ठाणे जिल्ह्यातील कल्याण-बदलापूर राज्य महामार्गाच्या विस्तारासंदर्भात दिनांक १६ मे, २०१५ रोजी सर्व संबंधितासमवेत उल्हासनगर येथील सार्वजनिक बांधकाम विभागाच्या कार्यालयात बैठक घेतलेली होती, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर बैठकीमध्ये कोणता निर्णय घेण्यात आला, त्यानुषंगाने सदर महामार्गाचा विस्तार करुन वाहनचालकांच्या सुरक्षिततेसंदर्भात शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. चंद्रकांत पाटील :** (१) होय.

(२) व (३) सदरहू बैठकीत झालेल्या चर्चेनुसार सार्वजनिक बांधकाम विभागाने रुंदीकरणात येणारी अतिक्रमणे काढली असून पुढील रुंदीकरणाचे काम मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरण यांचेमार्फत करण्यात येणार आहे.

-----------------

**देवद गाव ते नवीन पनवेल (ता.पनवेल, जि.रायगड) यांना जोडणा-या गाढी नदीवर पूल बांधण्याबाबत**

**(३३) * २४४०८ श्री.भरतशेठ गोगावले (महाड) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) रायगड जिल्ह्यातील देवद गाव ते नवीन पनवेल (ता.पनवेल) यांना जोडणाऱ्या गाढी नदीवर पूल बांधण्याची स्थानिक ग्रामस्थांची मागणी विचारात घेऊन उरण आणि पनवेल येथील लोकप्रतिनिधी यांनी माहे मार्च, एप्रिल व जून, २०११ मध्ये व्यवस्थापकीय संचालक, सिडको यांच्याकडे मागणी केली, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, देवद गाव ते नवीन पनवेल पूल यासाठी सन २०११ पासून अनेक वेळा व दिनांक २७ मार्च, २०१५ रोजीच्या पत्राव्दारे मा. मुख्यमंत्री, महाराष्ट्र राज्य आणि मा. पालकमंत्री, रायगड जिल्हा यांच्याकडे प्रत्यक्ष भेटून मागणी केली आहे, हे खरे आहे काय,

(३) असल्यास, सदर ठिकाणी वाहतूकीची कायमस्वरुपी व्यवस्था होऊन वाहतूक सुरळीत होण्यासाठी गाढी नदीवर पूल बांधण्याच्या दृष्टीने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस :** (१), (२) व (३) होय.

सदर जागेची वरिष्ठ नियोजनकार व मुख्य अभियंता, सिडको यांनी मार्च, २०१४ मध्ये पाहणी केली असून स्थळ परिस्थितीनुसार व नियोजनाच्या दृष्टीने सदरचा पूल बांधणे व्यवहार्य नसल्याचे आढळून आले आहे. तथापि, सदर ठिकाणालगतच्या नैना मधील २३ गावांच्या प्रारुप अंतरिम विकास आराखडयात पुलाचे नियोजन करण्यात आले आहे.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## जळकोट (जि.लातूर) तालुक्यात मागासवर्गीय मुला-मुलींकरिता वसतीगृह सुरु करण्याबाबत

**(३४) * २१५८८ डॉ.सुधाकर भालेराव (उदगीर) :** सन्माननीय **सामाजिक न्याय मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) जळकोट (जि.लातूर) तालुक्यात मागासवर्गीय मुलां-मुलींचे वसतीगृह नसल्यामुळे विद्यार्थ्यांना अडचणीचा सामना करावा लागत असल्याचे आढळून आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर तालुक्यात मागासवर्गीय मुलां-मुलींचे वसतीगृह मंजूर झाले, परंतु जागा उपलब्ध झाली नसल्याने सदर वसतीगृह दुसऱ्या तालुक्यात वळविण्यात आले आहे, हे खरे आहे काय,

(३) असल्यास, उक्त ठिकाणी नव्याने वसतीगृह मंजूर करुन त्यासाठी निधी उपलब्ध करुन वसतीगृहाची उभारणी करण्यात येणार आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने काय कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. राजकुमार बडोले :** (१) होय, हे खरे आहे.

(२) होय, हे खरे आहे.

शासन निर्णय दि.२८ जून, २००७ अन्वये लातूर जिल्ह्यातील रेणापूर, चाकूर, देवणी व जळकोट या तालुका स्तरांवर नवीन शासकीय वसतिगृहे सुरु करण्यास मान्यता देण्यात आलेली होती. यानुसार, रेणापूर, चाकूर व देवणी या ठिकाणी वसतिगृहे सुरु करण्यात आलेली होती. परंतु, जळकोट येथे शासकीय वसतिगृहासाठी जागा उपलब्ध न झाल्याने जळकोट येथील मंजूर वसतिगृह सन २०१० मध्ये मौजे देवणी येथील उपलब्ध जागेवर सुरु करण्यास मान्यता देण्यात आलेली आहे.

(३) व (४) जळकोट (जि.लातूर) येथे शासकीय वसतिगृहाच्या बांधकामासाठी खाजगी जमीन उपलब्ध झाल्याने तेथे नव्याने शासकीय वसतिगृह मंजूर करण्याबाबत प्रस्ताव आयुक्त, समाजकल्याण, पुणे यांनी दि. १२ जून, २०१५ रोजी शासनास सादर केलेला आहे. त्यानुसार, पुढील कार्यवाही करण्यात येत आहे.

(५) प्रश्न उद्भवत नाही.

----------------

## शासनाने मुंबई महानगर प्राधिकरण क्षेत्रात उद्योंगाचे स्थान ठरविणारे धोरण कालबाह्य झाल्याने रद्द करण्याचा घेतलेला निर्णय

**(३५) * २६८८६ श्री.पृथ्वीराज चव्हाण (कराड दक्षिण), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी) :** सन्माननीय **उद्योग मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मुंबई महानगर प्राधिकरण क्षेत्रात उद्योंगाचे स्थान ठरविणारे धोरण कालबाह्य झाल्याने ते रद्द करण्याचा निर्णय शासनाने घेतला असल्याचे माहे जून, २०१५ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उद्योगधंद्याच्या विस्तारीकरण व आधुनिकीकरणासाठी उद्योग विभागाच्या परवानगीची गरज लागणार नसून राज्य प्रदुषण नियंत्रण विभागाची परवानगी पुरेशी ठरणार आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, या निर्णयाची अंमलबजावणी करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. सुभाष देसाई :** (१), (२) व (३) होय.

औद्योगिक स्थान निश्चयन धोरण कालबाह्य झाल्यामुळे सदर धोरण उद्योग ऊर्जा व कामगार विभाग शासन निर्णय क्र. आयएलपी-२०१३/प्र.क्र.११६/उद्योग-२, दिनांक २०/०६/२०१५ अन्वये रद्द केले आहे.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## अण्णाभाऊ साठे महामंडळाकडून महिला समृध्दी योजनेअंतर्गत कर्ज वितरणामध्ये करण्यात आलेला गैरव्यवहार

**(३६) * २५६४१ श्री.सुनिल राऊत (विक्रोळी) :** सन्माननीय **सामाजिक न्याय मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मातंग व इतर पोटजातीतील गोर गरीब महिलांना आपल्या पायावर उभे राहण्यासाठी अण्णाभाऊ साठे महामंडळाकडून महिला समृध्दी योजना राबवली जाते, या योजनेअंतर्गत केवळ चार महिन्यात कोणत्याही निकषांचे पालन न करता ठराविक लोकांनाच १७५ कोटी रुपयांचे कर्ज वितरीत करण्यात आले असल्याचे माहे जुन, २०१५ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, महिला समृध्दी योजनेअंतर्गत झालेल्या या गैरव्यवहाराची शासन सीबीआय चौकशी करणार आहे काय, असल्यास, त्याचा तपशिल काय आहे,
(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. राजकुमार बडोले :** (१) होय, हे खरे आहे.
(२) सन २०१२-१३ ते २०१४-१५ या कालावधीत महामंडळामार्फत केलेल्या कामकाजाची राज्य गुन्हे अन्वेषण शाखा (सीआयडी) व आयुक्त समाजकल्याण, पुणे यांचेमार्फत चौकशी सुरु आहे.
(३) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## परतुर (जि.जालना) येथील रमाई घरकुल योजनेतील लाभार्थ्यांकरीता खरेदी खताची अट वगळण्याबाबत

**(३७) * २३८१२ श्री.संतोष दानवे (भोकरदन) :** सन्माननीय **सामाजिक न्याय मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) परतुर (जि.जालना) येथील रमाई घरकुल योजनेतील लाभार्थ्यांकरीता खरेदी खताची अट वगळण्यात यावी या मागणीसाठी योजनेतील लाभार्थ्यांनी उपविभागीय अधिकारी कार्यालयासमोर दिनांक ४ मे, २०१५ पासून आमरण उपोषण सुरु केले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, जालना जिल्ह्यातील साठेनगूर येथील रहिवाशी या जागेवर १९५२ पासून राहत असून त्यांनी शासनाच्या विविध योजनेचे लाभ घेतले असून त्यांना पालिकेनेच पाणीपुरवठा योजना, नाल्या, रस्ते, वीज आदि सुविधा पुरवल्या असतांना त्यांच्याकडून खरेदी खताची मागणी करण्यात येत आहे, हे खरे आहे काय,
(३) असल्यास, याबाबत शासनाने चौकशी केली आहे काय, त्यात काय आढळून आले व तदनुसार शासन स्तरावर काय कार्यवाही करण्यात आली वा येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. राजकुमार बडोले :** (१) होय.
(२) होय, अंशतः खरे आहे.
(३) रमाई आवास (घरकुल) योजने अंतर्गत घरकुलाचा लाभ घेण्यासाठी विहीत अटीनुसार लाभार्थ्याने जागेच्या मालकीच्या पुराव्यापैकी जागेचा एका पुरावा सादर करणे आवश्यक असल्याची बाब संबधितांना चर्चा करुन सांगण्यात आल्यानंतर त्यांनी दिनांक ७.५.२०१५ रोजी उपोषण मागे घेतले आहे.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

**नांदेड जिल्हापरिषदेच्या व्यसनमुक्ती व प्रचार**
**कार्य योजनेत अपहार झाल्याबाबत**

**(३८) * २३०४५ श्रीमती अमिता चव्हाण (भोकर), श्री.डी.पी.सावंत (नांदेड उत्तर), श्री.वसंतराव चव्हाण (नायगांव), डॉ.संतोष टारफे (कळमनुरी), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी), श्रीमती निर्मला गावित (इगतपूरी), श्री.हेमंत पाटील (नांदेड दक्षिण), श्री.सुभाष साबणे (देगलूर) :** सन्माननीय **सामाजिक न्याय मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) नांदेड जिल्हापरिषदेच्या समाजकल्याण विभागामार्फत चालविल्या जाणाऱ्या व्यसनमुक्ती व प्रचार कार्य योजनेत २ लाख २५ हजार रुपयांचा अपहार झाला असल्याचे माहे मार्च २०१५ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उपरोक्त अपहाराची शासनाने चौकशी केली आहे काय, त्यात काय आढळून आले तसेच दोषी संबंधितांवर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. राजकुमार बडोले :** (१) नाही, हे खरे नाही.

प्रस्तुत रु.२.२५ लाख एवढ्या रकमेपैकी रु.५१,४६५/- एवढी रक्कम खर्च झालेली असून रु. १,७३,५३५/- एवढी रक्कम अखर्चित शिल्लक आहे.

(२) व (३) सदर प्रकरणी वित्तीय अनियमितता झाल्याने चौकशी करुन अहवाल सादर करण्याबाबत संबधितांना सूचना देण्यात आलेल्या आहेत.

-----------------

**कोल्हापूर जिल्हयातील साखर कारखान्यांनी शेतकऱ्यांना, ऊस तोडणी कामगार वाहतूकदार यांना देय रक्कमा दिल्या नसल्याबाबत**

**(३९) * २२९९२ श्री.उल्हास पाटील (शिरोळ) :** सन्माननीय **सहकार मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) कोल्हापूर जिल्हयातील साखर कारखान्यांनी सन २०१४-१५ चा हंगाम संपला तरी अद्याप ऊस उत्पादक शेतकऱ्यांबरोबरच ऊस तोडणी कामगार वाहतूकदार अशा अन्य घटकांनीही त्यांच्या येणे असलेल्या रक्कमा दिल्या नसल्याचे दिनांक २० एप्रिल, २०१५ रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, ऊस बिलाच्या माध्यमातून येणारा पैसा थांबल्याने ऊस उत्पादक तसेच इतरांची मोठ्या प्रमाणात आर्थिक कोंडी होऊन ग्रामीण भागातील उलाढाल मंदावली आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, या प्रकरणी चौकशी केली आहे काय, चौकशीत किती व कोणत्या साखर कारखान्यांनी अद्यापही पैसे दिले नसल्याचे निदर्शनास आले आहे व अशा कारखान्यांविरुध्द कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. चंद्रकांत पाटील :** (१) कोल्हापूर जिल्ह्यातील साखर कारखान्यांनी ऊस उत्पादक शेतकरी व ऊसतोडणी वाहतूक कामगारांच्या देय रक्कमा दिले नसल्याबाबत प्रादेशिक सहसंचालक (साखर) कोल्हापूर यांचे कार्यालयाकडे प्राप्त झालेल्या दिनांक २/६/२०१५ व दि. ४/६/२०१५ चे निवेदनाव्दारे निदर्शनास आले आहे.

(२) कोल्हापूर जिल्ह्यातील २१ साखर कारखान्यांनी सन २०१४-१५ चा गळीत हंगाम घेतलेला आहे. सदर कारखान्यांकडे दि. ३०/६/२०१५ अखेर FRP प्रमाणे देय ऊस देयके रु. ३३२६.३४ कोटी असून त्यापैकी साखर कारखान्यांनी रु. २७७७.७० कोटी ऊस देयके ऊस पुरवठादार शेतक-यांना अदा केलेली आहेत आणि रु. ५४८.६४ कोटी ऊस देयके थकीत आहेत.

(३) कोल्हापूर जिल्ह्यातील २१ साखर कारखान्यांकडे दि. ३०/०६/२०१५ अखेर रु. ५४८.६४ कोटी देय ऊस देयके थकीत आहे. थकीत FRP संदर्भात संबंधीत कारखान्यांच्या साखर आयुक्तालयामध्ये वेळोवेळी सुनावण्या घेवून FRP अदा करण्याबाबत सूचना देण्यात आल्या असून अद्याप सुनावण्या सुरु आहेत.

तसेच प्रादेशिक सहसंचालक (साखर) कोल्हापूर यांनी त्यांचे कार्यालयात संबंधीत कारखान्यांची दि. १०/०६/२०१५ रोजी बैठक घेऊन शेतक-यांची थकीत ऊस बिले व ऊसतोडणी वाहतूकदारांच्या थकीत रक्कमा देणेबाबत सूचना दि. ६/७/२०१५ चे पत्रान्वये कळविले आहेत.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## ठाणे जिल्ह्यातील बदलापूर पूर्व विभागात कारखान्यांमुळे प्रदूषण होत असल्याबाबत

**(४०) * १९३५६ श्री.किसन कथोरे (मुरबाड), श्री.रमेश कदम (मोहोळ) :** सन्माननीय **पर्यावरण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) ठाणे जिल्ह्यातील कुळगांव बदलापूर नगरपालिका हद्दीतील बदलापूर पूर्व

विभागात महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळाच्या अनेक कारखान्यांच्या प्रदुषणामुळे नागरिक हैराण झालेले असून या बाबतीत स्थानिक नगरसेवक व नागरीकांनी महाराष्ट्र प्रदुषण नियमक महामंडळाच्या संबंधित अधिकाऱ्यांना माहे फेब्रुवारी, २०१५ मध्ये वा त्या सुमारास पत्र दिले असतानाही संबंधित अधिकारी कारखान्यांच्या मालकास पाठीशी घालून नागरिकांच्या जीवाशी खेळत असल्याचे निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, या बाबत शासनाने चौकशी केली आहे काय, तसेच चौकशीअंती संबंधित अधिकारी व प्रदुषण करणाऱ्या कंपन्यावर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. रामदास कदम :** (१) हे खरे नाही.

(२) प्रस्तुत प्रकरणी महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळामार्फत केलेल्या तपासणीत दोषी आढळलेल्या तीन कारखान्यांवर कारणे दाखवा नोटीस बजावण्याची कार्यवाही करण्यात आली आहे.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## महाड औद्योगिक वसाहतीमधील सांडपाणी वाहून नेणारी वाहिनी फुटल्याने शेतीचे नुकसान झाल्याबाबत

**(४१) * १८९४७ श्री.अवधूत तटकरे (श्रीवर्धन), श्री.रमेश कदम (मोहोळ), श्री.राहुल जगताप (श्रीगोंदा), श्री.जितेंद्र आव्हाड (मुंब्रा कळवा) :** सन्माननीय **उद्योग मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) महाड औद्योगिक वसाहतीमधील सांडपाणी वाहून नेणारी वाहिनी दिनांक २३ एप्रिल, २०१५ वा त्या सुमारास चोचिंदे या गावाजवळ फुटल्याने सांडपाणी परिसरातील शेतात शिरल्यामुळे शेतीचे नुकसान झाले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, या प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, असल्यास, त्यात काय आढळून आले आहे व त्यानुसार नुकसानग्रस्त शेतक-यांना नुकसान भरपाई देण्यात आली आहे काय,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. सुभाष देसाई :** (१), (२) व (३) महाड औद्योगिक वसाहतीमधील चोचिंदे या गावाजवळ महामंडळाची सांडपाणी वाहिनी दि. २२/४/२०१५ रोजी रात्री ८.३० वा.

फुटल्यामुळे सांडपाणी वाहिनीजवळच्या ५ शेतांमध्ये पसरले होते. तथापि, शेतामध्ये पिके नव्हती. परंतु, शेतकऱ्यांच्या शेतजमिनीचे नुकसान सांडपाणी शेतात घुसल्यामुळे झाल्याने नुकसानीचा पंचनामा तलाठी, शिरगाव यांच्यामार्फत करण्यात आला असून जमिनीच्या नुकसानीबाबत उचित कार्यवाही करुन कार्यपूर्ती अहवाल सादर करण्याबाबत तहसिलदार, महाड यांनी दि. २३/४/२०१५ रोजी तालुका कृषी अधिकारी, महाड यांना कळविले आहे.

-----------------

## अकोला, बाळापूर पातूर व मुर्तिजापूर जिल्हा निबंधक कार्यालयांनी निकृष्ट दर्जाचे साहित्य खरेदी करुन गैरव्यवहार केल्याबाबत

**(४२) * २६४२२ श्री.हरिष पिंपळे (मुर्तिजापूर) :** सन्माननीय **सार्वजनिक बांधकाम (सार्वजनिक उपक्रम वगळून) मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) अकोला, बाळापूर पातूर व मुर्तिजापूर येथील जिल्हा निबंधक व सहाय्यक दुय्यम निबंधक या कार्यालयांना सन २०१२ ते २०१४ या कालावधीत फर्निचर/साहित्य पुरवठा करण्यात आला आहे, हे खरे आहे काय,

(२) तसेच उक्त प्रकरणी निविदा न काढता निकृष्ट दर्जाचे लाखो रुपयांचे फर्निचर/साहित्य खरेदी करुन गैरव्यवहार केल्याचे निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(३) असल्यास, उक्त प्रकरणात स्थानिक पातळीवर किंवा दक्षता पथक, मुंबई यांचे मार्फत चौकशी करण्यात आली आहे काय, चौकशीत काय आढळून तसेच दोषी संबंधितावर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. चंद्रकांत पाटील :** (१) हे खरे आहे.

सन २०१२-१३ या कालावधीमध्ये अकोला, बाळापूर, पातूर व मूर्तिजापूर येथील जिल्हा निबंधक व सहाय्यक दुय्यम निबंधक या कार्यालयांना फर्निचर/साहित्य पुरवठा महाराष्ट्र राज्य लघु उद्योग विकास महामंडळ मर्यादित, अकोला मार्फत करण्यात आलेला आहे.

(२) उद्योग, ऊर्जा व कामगार विभागाचे शासन परिपत्रक क्र.एसपीओ-१०८८/२५१२/आयएनडी/६ दि. २.१.१९९२ च्या मुद्दा क्र. ५ नुसार शासकीय कार्यालयांसाठी लागणारे फर्निचर हे महाराष्ट्र राज्य लघु उद्योग विकास महामंडळामार्फत खरेदी करण्यात यावे असे निर्देश असल्याने सदर कार्यालयांना

महाराष्ट्र राज्य लघुउद्योग विकास महामंडळ मर्यादित, अकोला यांचेकडून नियमानुसार खरेदी करुन फर्निचर पुरवठा करण्यात आला आहे.
(३) व (४) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

**शेंद्रा-बिडकोन मेगापार्कसाठी संपादित केलेल्या जमिनीचा मोबदला शेतक-यांना मिळाला नसल्याबाबत**

**(४३) * २६१०१ श्री.संदीपानराव भुमरे (पैठण) :** सन्माननीय **उद्योग मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) दिल्ली-मुंबई इंडस्ट्रीयल कॉरिडोरच्या शेंद्रा-बिडकोन मेगापार्कसाठी बिडकीनसह पाच गावांची माहे मे, २०१५ च्या सुमारास जमिन संपादन केली आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, संपादित केलेल्या जमिनीच्या मोबदल्याचे वाटप करण्यात आले असले तरी वर्ग २ च्या जमिनीचा मोबदला शेतक-यांना मिळालेला नाही, हे खरे आहे काय,
(३) असल्यास, सदरचा मोबदला सात दिवसांत द्या अन्यथा विभागीय आयुक्त कार्यालयासमोर बेमुदत उपोषण करण्याचा इशारा दिनांक १३ मे, २०१५ रोजीच्या सुमारास शेतक-यांनी विभागीय आयुक्तांना दिला आहे, हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, शेतक-यांना जमिनीचा मोबदला देण्यासंदर्भात शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. सुभाष देसाई :** (१), (२) व (३) होय, हे खरे आहे.
(४) बिडकीन औद्योगिक क्षेत्रासाठी अधिसूचित करण्यात आलेल्या क्षेत्रापैकी मौजे. बिडकीन व वस्तीतांडा येथील सरकारी जमिनीचे (वर्ग-२) ३४६ हे.आर. इतके क्षेत्र असून जिल्हाधिकारी, औरंगाबाद यांच्या पूर्वपरवानगी शिवाय मागील ३५ वर्षात खरेदी खताच्या आधारे हस्तांतरण झालेले आहे. सदरचे व्यवहार नियमानुसार करण्यासंबंधीचे १६५ प्रस्ताव जिल्हाधिकरी, औरंगाबाद यांच्याकडे मान्यतेसाठी पाठविण्यात आले असून त्यापैकी १०१ प्रकरणात त्रुटी असल्याने त्या त्रुटी दूर करण्यासाठी सदर प्रकरणे उपविभागीय अधिकारी यांच्याकडे परत पाठविण्यात आली असून त्रुटींची पुर्तता करण्यात आल्यानंतर संबंधितांना तातडीने नियमानुसार मोबदला वाटपाची कार्यवाही करण्यात येईल.

तसेच ज्या सरकारी जमिनींचे विक्री करण्यात आलेली नाही अथवा ज्या जमिनी मुळ मालक अथवा वारसांच्या नावे आहेत अशा सरकारी जमिनी संदर्भात अभिलेखाची तपासणी करुन नियमाप्रमाणे संपादीत जमिनीचा मावेजा अदा करण्याची कार्यवाही सुरु आहे.

(५) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

**युनिलिव्हर इंडस्ट्रिज प्रा.जि सी-९ खामगाव (जि.बुलढाणा) येथील कंपनी मानवी जीवनासाठी धोकादायक असल्याबाबत**

**(४४) * १९७७६ डॉ.संजय रायमुलकर (मेहकर) :** सन्माननीय **उद्योग मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) खामगाव (जि. बुलढाणा) येथील एमआयडीसी परिसरातील हिंदुस्थान युनिलिव्हर लिमिटेड या कंपनीची दुय्यम कंपनी युनिलिव्हर इंडस्ट्रिज प्रा.लि.सी-९ ही एरोसेल सौंदर्य प्रसाधन उत्पादन करणारी कंपनी मानवी जीवनासाठी धोकादायक असल्याने ती बंद करण्यात यावी, अशी मागणी मा.जिल्हाधिकारी यांच्याकडे दिनांक ५ मे, २०१५ रोजी भ्रष्टाचार निर्मुलन समितीने केली, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, या मागणीनुसार शासनाने या कंपनीची तपासणी केली आहे काय, त्यात काय आढळून आले व तपासणीनुसार संबंधित कंपनीवर कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. सुभाष देसाई :** (१) होय, हे खरे आहे. तथापि, भ्रष्टाचार निर्मुलन समितीने दि.५ मे, २०१४ रोजी जिल्हादंडाधिकारी, बुलढाणा यांच्याकडे तक्रार केली आहे.

(२) भ्रष्टाचार निर्मुलन समितीने केलेली तक्रार उपविभागीय दंडाधिकारी, खामगाव यांच्याकडे चौकशीसाठी पाठविण्यात आली असता मे. युनिलिव्हर इंडस्ट्रिज प्रा. लि. या कंपनीने आवश्यक ते सर्व परवाने प्राप्त केले आहेत. तसेच कंपनीविरुध्द केलेली तक्रारही तथ्यहीन व निराधार असल्याचे सिध्द होत आहे असे त्यांनी चौकशी अहवालात नमूद केले आहे.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

**खालापूर (जि.रायगड) तालुक्यातील नारंगी येथे**
**औद्योगिक वसाहत उभारण्याबाबत**

**(४५) * २०९९४ श्री.सुरेश लाड (कर्जत), श्री.जितेंद्र आव्हाड (मुंब्रा कळवा), श्री.भास्कर जाधव (गुहागर), श्री.रमेश कदम (मोहोळ), श्री.पांडुरंग बरोरा (शहापूर), श्री.अवधूत तटकरे (श्रीवर्धन) :** सन्माननीय **उद्योग मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) खालापूर (जि. रायगड) तालुक्यातील नारंगी येथे औद्योगिक वसाहत उभारण्याची बाब शासनाच्या विचाराधीन आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर विचाराधीन बाबींवर शासनाने निर्णय घेतला आहे काय,

(३) असल्यास, निर्णयाचे स्वरुप काय आहे व उक्त ठिकाणी औद्योगिक वसाहत उभारण्याच्या दृष्टीने शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. सुभाष देसाई :** (१), (२) व (३) होय, हे खरे आहे. खालापूर औद्योगिक क्षेत्र टप्पा क्र.३ विकसित करण्यासाठी मौजे, नारंगी, चिलठण, स्वाली, तोंडली, आपटी व गोरठण खुर्द ता. खालापूर, जि. रायगड येथील खाजगी २२६.३४.७ हे.आर. व सरकारी २.५४.५ हे.आर. अशा एकूण २२८.८९.२ हे.आर. क्षेत्र अधिसूचित करण्याची अधिसूचना दि. १५/९/२००६ रोजी प्रसिध्द करण्यात आली आहे. तसेच सदर क्षेत्रापैकी १८७.३७.९ हे.आर.इतक्या क्षेत्राची संयुक्त मोजणी करण्यात आली त्यापैकी ४१.६०.८ हे.आर. वगळून शिल्लक राहणाऱ्या क्षेत्रापैकी ११८.८२ हे.आर. क्षेत्रास ३२ (१) नुसार भूसंपादनाची कार्यवाही करण्यास मान्यता दिलेली आहे. उर्वरित ६५.९१.९ हे.आर. क्षेत्रासंदर्भात महाराष्ट्र औद्योगिक विकास अधिनियम १९६१ च्या कलम ३२ (२) नुसार भूसंपादन करण्याची कार्यवाही सुरु आहे.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

**नांदेड येथील कृष्णुर औद्योगिक वसाहतीमधील**
**रस्ते निकृष्ट दर्जाचे असल्याबाबत**

**(४६) * २६७८१ श्री.हेमंत पाटील (नांदेड दक्षिण), श्री.सुभाष साबणे (देगलूर) :** सन्माननीय **उद्योग मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) नांदेड येथील कृष्णूर औद्योगिक वसाहतीमधील ६ ते ७ कोटी रुपये खर्चुन

बांधण्यात आलेले रस्ते अत्यंत निकृष्ट दर्जाचे असल्याचे माहे एप्रिल, २०१५ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, या प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले,

(३) असल्यास, चौकशीनुसार संबंधित दोषींवर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. सुभाष देसाई :** (१) व (२) हे खरे नाही.

महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळाने कृष्णूर येथे औद्योगिक क्षेत्र विकसीत केले असून, त्या औद्योगिक क्षेत्रातील रस्त्याची कामे निविदा मागवून ठरलेल्या मानकानुसार करण्यात आलेली आहेत. तसेच सदर औद्योगिक क्षेत्रात आतापर्यंत झालेल्या, सर्व रस्त्यांची कामे सुस्थितीत असून त्यावरुन वाहतूक सुरळीतपणे सुरु आहे.

(३) व (४) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## वर्धा जिल्हयातील मागासवर्गीय विद्यार्थ्यांच्या शिष्यवृत्तीमध्ये झालेला गैरव्यवहार

**(४७) * २६५७१ श्री.विजय वडेट्टीवार (ब्रम्हपूरी) :** सन्माननीय **सामाजिक न्याय मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) महाराष्ट्र राज्य तंत्रशिक्षण मंडळ अंतर्गत मागासवर्गीय विद्यार्थ्यांना मिळणारी शिष्यवृत्ती ११८ संस्थांनी घेऊन एकट्या वर्धा जिल्हयात ६३ कोटी ३० लाख रुपयांचा गैरव्यवहार झाल्याचा चौकशीमध्ये आढळून आल्यानंतर सुध्दा अद्यापही गैरव्यवहार करणा-या संस्थेवर कोणत्याही प्रकारची कारवाई करण्यात आलेली नसल्याची माहिती दिनांक १४ जून, २०१५ रोजी वा त्या सुमारास निदर्शनास आली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, या गंभीर प्रकरणाची एका अधिका-याकडून चौकशी करण्यात आल्यानंतर चौकशीअंती ११८ संस्थांनी ६३ कोटी ३० लाख रुपयांचा गैरव्यवहार केला असल्याचे अहवालात म्हटले आहे, हे ही खरे आहे काय, असल्यास, या गंभीर प्रकरणाची दुस-या अधिका-यांकडून चौकशी करण्यात आल्यावर चौकशीअंती ९६ संस्थांनी २० कोटी रुपयांचाच गैरव्यवहार केला असल्याचे अहवालात म्हटले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, सदर प्रकरणाची शासनाने चौकशी केली आहे काय व चौकशीअंती दोषी संबंधितांवर कोणती कारवाई करण्यात आली वा येत आहे
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. राजकुमार बडोले :** (१), (२), वर्धा जिल्हयामध्ये शिष्यवृत्ती योजनेमध्ये गैरव्यवहार झाल्याच्या तक्रारीच्या अनुषंगाने सहायक संचालक (लेखा), अमरावती यांच्या अध्यक्षतेखाली चौकशीसाठी समिति नेमण्यात आली होती. सदर समितीने चौकशी करुन अहवाल शासनास सादर केला होता. सदर अहवालातील काही मुद्दे अनुत्तरीत असल्याने आयुक्त, समाजकल्याण, पुणे यांच्या अध्यक्षतेखाली समिती नेमण्यात आली होती. सदर समितीने शासनास सादर केलेल्या अहवालानुसार ११८ महाविद्यालयांनी एकूण रुपये ६६.२६ कोटी एवढी रक्कमेचा अनियमितता केल्याचे दिसून आले आहे.
(३) सदर समितीच्या शिफारशीनुसार शिष्यवृत्ती वाटपातील अनियमिततेसंदर्भात सदर संस्थांवर फौजदारी गुन्हे दाखल करणे, संस्थांकडून शासकीय रकमांची वसुली करण्याची कार्यवाही करणेबाबतचे निर्देश आयुक्त, समाजकल्याण आयुक्तालय, पुणे यांना देण्यात आले आहेत. तसेच सदर संस्थांची मान्यता रद्द करणेसंदर्भात उच्च व तंत्रशिक्षण विभागास कळविण्यात आले आहे. त्याप्रमाणे गैरव्यवहारास जबाबदार असलेल्या १४ अधिकारी/कर्मचारी यांची विभागीय चौकशी करण्याच्या सूचना देण्यात आल्या आहेत.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## सोलापूर जिल्हयात समाजकल्याण विभागामार्फत विद्यार्थ्यांना दिल्या जाणाऱ्या शिष्यवृत्तीत गैरव्यवहार झाल्याबाबत

**(४८) * २५८२६ श्री.अब्दुल सत्तार (सिल्लोड), श्री.लक्ष्मण जगताप (चिंचवड) :** सन्माननीय **सामाजिक न्याय मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) सोलापूर जिल्हयात समाजकल्याण विभागामार्फत विद्यार्थ्यांना दिल्या जाणाऱ्या शिष्यवृत्तीत कार्यरत कर्मचाऱ्यांनीच १ कोटी १७ लाख ९३ हजार १७८ रुपये नातेवाईक व मित्रांच्या नावाने पैसे काढून शासनाची फसवणूक केल्याची बाब दिनांक ७ जून, २०१५ रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आली आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, सदर प्रकरणी बझार पोलिस ठाण्यात ३२ जणांविरुध्द गुन्हा दाखल करण्यात आला आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने काय कार्यवाही केली वा करण्यात येत आहे तसेच संबंधित दोषींवर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. राजकुमार बडोले :** (१) होय.

ई-शिष्यवृत्तीच्या कामासाठी नेमण्यात आलेले मास्टेक कंपनीचे कर्मचारी कु. सारिका द. काळे यांनी त्यांचे नातेवाईक व मित्राच्या नावाने शिष्यवृत्तीचे पैसे काढून अपहार केल्याचे सकृतदर्शनी निदर्शनास आले आहे.
(२) व (३) सदर प्रकरणी कु. सारिका द. काळे व इतर ३२ जणांविरुध्द बझार पोलीस स्टेशन येथे दिनांक ६/६/२०१५ रोजी गुन्हा दाखल करण्यात आलेला आहे. सदर गुन्हयाबाबत पोलीसामार्फत पुढील तपास सुरु आहे.
(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## अमरावती जिल्हयाच्या अनुसूचित जाती व नवबौध्द घटकांच्या वस्तीचा विकास करण्याबाबत

**(४९) * १७०१४ प्रा.विरेंद्र जगताप (धामणगाव रेल्वे), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी), ॲड.यशोमती ठाकूर (सोनावणे) (तिवसा) :** सन्माननीय **सामाजिक न्याय मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) अमरावती जिल्हयाच्या अनुसूचित जाती व नवबौध्द घटकांच्या वस्तीचा विकास करणे अंतर्गत पूर्ण करण्यात आलेल्या कामाचा अंतिम हप्ता त्वरीत प्रदान करण्याकरीता मा.स्थानिक लोकप्रतिनिधी यांनी मा.आयुक्त, समाजकल्याण आयुक्तालय, महाराष्ट्र राज्य, पुणे-१, यांना माहे मे, २०१५ मध्ये वा त्यादरम्यान लेखी निवेदन दिले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, सदरहू निवेदनावर शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. राजकुमार बडोले :** (१) होय.
(२) सदर योजनेंतर्गत अखर्चीत निधी खर्च करण्यास मान्यता देण्यासाठी आवश्यक असलेली विहीत प्रपत्रातील माहिती जिल्हा परिषद अमरावती कडून मागविण्यात आलेली आहे.
(३) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

**कापूस उत्पादक शेतक-यांना अग्रीम बोनस देण्याबाबत**

**(५०) * १६६४३ श्रीमती निर्मला गावित (इगतपूरी), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी), डॉ.संतोष टारफे (कळमनुरी) :** सन्माननीय **पणन मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) कापूस एकाधिकार योजनेत शेतकऱ्यांना पणन महासंघामार्फतच अग्रीम बोनस देण्यात येत होता, परंतू कापूस एकाधिकार योजना गुंडाळल्यानंतर अग्रीम बोनस देण्याची योजना त्याच वेळी बंद पडली असल्याचे माहे एप्रिल, २०१५ मध्ये वा त्या दरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, या वर्षी कापूस उत्पादक शेतकऱ्यांना अग्रीम बोनस देण्यासंदर्भात शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. चंद्रकांत पाटील :** (१) व (२) सन २००४-०५ पासून कापसासाठी अग्रीम अधिक किंमत/बोनस देण्यात येत नाही.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

**कापुरबावडी - माजीवाडा (जि.ठाणे) येथील मुंबईकडील मार्गिकेचे काम निकृष्ट दर्जाचे झाल्याबाबत**

**(५१) * १७९४५ श्री.जितेंद्र आव्हाड (मुंब्रा कळवा), श्री.पांडुरंग बरोरा (शहापूर), श्री.हनुमंत डोळस (माळशिरस), श्री.किसन कथोरे (मुरबाड), श्री.शशिकांत शिंदे (कोरेगाव), श्री.जयंत पाटील (इस्लामपूर), श्री.वैभव पिचड (अकोले) :** सन्माननीय **सार्वजनिक बांधकाम (सार्वजनिक उपक्रम) मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) ठाणे येथील कापूरबावडी-माजीवाडा नाक्यावरील वाहतूक कोंडी सोडविण्यासाठी उभारण्यात आलेल्या मुंबईकडील मार्गिकेचे काम निकृष्ट दर्जाचे झाल्याप्रकरणी चौकशी करण्यासाठी नेमलेल्या तांबे समितीने आपला अहवाल शासनास सादर केलेला आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सादर केलेल्या अहवालाचे स्वरुप काय आहे,

(३) तसेच सदरहू अहवालानुसार दोषींविरोधात शासनाने कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. एकनाथ शिंदे :** (१) नाही. सदर समितीच्या कार्यकक्षेमध्ये ३८५० मी. लांबीच्या कापूरबावडी उड्डाणपुलाच्या सर्वसाधारण आराखडा, बांधकामाचा दर्जा तसेच इतर अनुषांगिक बाबीचा समावेश आहे. समितीचा अहवाल अद्याप प्राप्त व्हावयाचा आहे.

(२) प्रश्न उद्भवत नाही.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

**महाड (जि.रायगड) येथील भारतरत्न डॉ.बाबासाहेब आंबेडकर राष्ट्रीय स्मारकाची झालेली दूरवस्था**

**(५२) * २५०२६ श्री.भरतशेठ गोगावले (महाड) :** सन्माननीय **सामाजिक न्याय मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) महाड (जि.रायगड) येथील भारतरत्न डॉ.बाबासाहेब आंबेडकर राष्ट्रीय स्मारकाची दुरवस्था व बार्टीकडून मनमानी कारभार सुरु असल्याची बाब माहे मे, २०१५ मध्ये वा त्या दरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उभारणी करण्यात आलेल्या स्मारकामध्ये २० कोटी रुपये खर्च करून ग्रंथालय, नाट्यगृह, बहुउद्देशीय सभागृह, वस्तूसंग्रहालय, व्यापारी संकुल, तरणतलाव, कॉन्फरन्स हॉल, विश्रामगृह आदि सुविधा उपलब्ध करून देण्यात आल्या आहेत, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, सदर स्मारकातील नाट्यगृह गेल्या वर्षभरापासून बंद आहे त्यामुळे महाडकरांना सांस्कृतिक कार्यक्रमापासून वंचित रहावे लागत आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, सदर स्मारकातील नाट्यगृह तसेच प्रलंबित इतर अपूर्ण असलेली कामे सुरु करुन सदरचे राष्ट्रीय स्मारक बार्टीकडून काढून हे राष्ट्रीय स्मारक महाड नगरपालिका किंवा सामाजिक न्याय विभागाच्या ताब्यात देण्याबाबतचा अहवाल शासनाला द्यावा तसेच या स्मारकाच्या देखभाल दुरुस्ती व्यवस्थापनासाठी स्थानिक सल्लागार व नियोजन समिती गठीत करावी, अशी भारतरत्न डॉ.बाबासाहेब आंबेडकर राष्ट्रीय स्मारक बचाव कृती समितीच्या वतीने दिनांक २१ मार्च,२०१५ रोजी निवेदनाद्वारे मा.मुख्यमंत्री महोदयांना विनंती केली आहे, हे खरे आहे काय,

(५) असल्यास, याबाबत शासनाने कोणता निर्णय घेतला वा घेण्यात येत आहे, नसल्यास त्याची कारणे काय आहेत ?

**श्री. राजकुमार बडोले :** (१) नाही.

(२) होय.

(३) नाही.

(४) व (५) या संदर्भात डॉ. बाबासाहेब आंबेडकर राष्ट्रीय स्मारक बचाव कृती समितीने दिनांक ४.४.२०१५ च्या पत्रान्वये मा. मुख्यमंत्री महोदयांकडे निवेदन दिले आहे. सदरहू निवेदनात नमुद तक्रारीप्रमाणे वस्तुस्थिती आढळुन येत नसल्याने, या प्रकरणी अधिक कार्यवाहीची आवश्यकता दिसुन येत नाही.

-----------------

## सामाजिक न्याय विभागाने अनुसूचित जातींच्या सहकारी संस्थांना अर्थसहाय्य करण्याची दीर्घ मुदतीची योजना सुरु केल्याबाबत

**(५३) * २३७५२ श्री.उल्हास पाटील (शिरोळ) :** सन्माननीय **सामाजिक न्याय मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्य शासनाच्या सामाजिक न्याय आणि विशेष सहाय्य विभागाने माहे फेब्रुवारी, २००४ मध्ये अनुसूचित जातींच्या सहकारी संस्थाना (एसीसीएस) अर्थसहाय्य करण्याची दीर्घ मुदतीची योजना सुरु केली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, श्री.अंबाई मागासवर्गीय शेतमाल प्रक्रिया संस्था मर्यादित या जयसिंगपूर तालुक्यातील शिराळ (जि. कोल्हापूर) येथील खांडसरी कारखान्याने जून २००४ मध्ये विशेष सहाय्यासाठी संचालकांकडे प्रस्ताव पाठविला, हे ही खरेआहे काय,

(३) असल्यास, आयुक्त आणि संचालक यांनी सहा कारखान्यांचे मुल्यमापन अहवालात प्रतिकुल शेरे मारले असतांनाही या संस्थेने आपला प्रकल्प, यंत्र सामुग्री, जड संग्रह, परवाना आणि संस्थेचे नाव कोल्हापूर जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँक मर्यादित यांच्याकडे फेब्रुवारी, १९९९ मध्ये ३ कोटी रुपयांचे कर्ज घेऊन गहाण ठेवले असतांना सदर संस्थेला विभागाने जुलै, २००४ मध्ये रु. २.४० कोटीचे भाग भांडवल आणि रु. २.४० कोटीचे दिर्घ मुदतीचे कर्ज वितरित केले असल्याचे नुकतेच निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(४) असल्यास, या प्रकरणी दिलेले कर्ज अद्यापही वसूल झाले नाही, हे ही खरे आहे काय,

(५) असल्यास या प्रकरणाची शासनाने चौकशी केली आहे काय, असल्यास चौकशीच्या अनुषंगाने पुढे कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(६) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. राजकुमार बडोले :** (१) होय.

(२) होय.

(३) सदर संस्थेने कोल्हापूर जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकेकडे सिध्द खांडसरी कडून विकत घेतलेल्या प्रकल्पातील मशिनरी, डेडस्टॉक, लायसन्स व गुडविल तारण ठेवले होते. शासनाने सदर संस्थेस आधुनिकीकरणासाठी भाग भांडवल व कर्ज मंजुर करताना संस्थेची जमीन व भविष्यात खरेदी करण्यात येणारी मशिनरी, यंत्र सामग्री व संचालक मंडळाची मालमत्ता शासनाकडे गहाण ठेवल्याचे कबुल केले होते. या सर्व बाबींचे मुल्य हे शासनाने मंजुर केलेल्या निधीपेक्षा अधिक होते. सदर मालमत्ता भाग भांडवल व कर्जाच्या रकमेची परतफेड होईपर्यंत शासनाकडे गहाण ठेवल्यानंतर संस्थेला उचल दिलेली आहे.

(४) वित्त विभागाने कर्ज वसुलीच्या लेखाशिर्षास मान्यता दिली आहे. तसेच महालेखापाल यांची सुध्दा सदरील कर्ज वसुलीच्या लेखाशिर्षास मान्यता आवश्यक आहे. लेखाशिर्षास महालेखापाल यांची मान्यता घेण्याची कार्यवाही सुरु आहे.

(५) व (६) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## नांदेड जिल्हयात दलितवस्ती विकास कामांमध्ये स्वत: अधिकारीच ठेकेदार बनल्याबाबत

**(५४) * २६७९० श्री.हेमंत पाटील (नांदेड दक्षिण), श्री.सुभाष साबणे (देगलूर) :** सन्माननीय **सामाजिक न्याय मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) नांदेड जिल्हा परिषदेच्या समाज कल्याण विभागाकडून १४ कोटी ८६ लाख रुपयांच्या दलितवस्ती विकास कामांमध्ये स्वत: अधिकारीच ठेकेदार बनल्याचे नुकतेच माहे जून, २०१५ मध्ये वा त्या दरम्यान निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, दलित वस्तीसह अन्य योजनांच्या विकास कामात स्वत: पदाधिकारी व त्यांच्या नात्या गोत्यातील लोक गुत्तेदार बनल्याची अनेक उदाहरणे यापूर्वी समोर आली असतांनाही वारंवार असे प्रकार होत आहेत, हे खरे आहे काय,

(३) असल्यास, याबाबत शासनाने चौकशी केली आहे काय, त्यात काय आढळून आले व तद्‌नुसार दोषी व्यक्तींवर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. राजकुमार बडोले :** (१) व (२) नांदेड जिल्हा परिषदे मार्फत मे, २०१५ मध्ये रु. १४.८६ कोटी विकास कामांचे आदेश निर्गमीत केले आहेत. शासन निर्णयानुसार सदरची मंजुर विकास कामे ही ग्रामपंचायती मार्फत करण्यात येतात. तसेच पंचायत समिती मार्फत ग्रामपंचायतीना निधी वर्ग करण्यात येतो व योजनेच्या मार्गदर्शक सुचनेनुसार कामे पुर्ण केली जातात.
(३) व (४) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

**शासनाने राज्यात बीपीओ योजना राबविण्याचा घेतलेला निर्णय**

**(५५) * २५८३० श्री.अब्दुल सत्तार (सिल्लोड), श्री.अमित झनक (रिसोड) :** सन्माननीय **उद्योग मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) देशातील छोट्या (टिअर २ आणि टिअर ३) शहरांमध्ये बीपीओ कॉल सेंटर्स उभारणाऱ्या कंपन्यांना केंद्र शासन आर्थिक मदत देणार असून या योजनेसाठी केंद्र शासनाने ४९८ कोटी रुपयांची तरतूद केलेली आहे आणि यातून सुमारे दीड लाख थेट नोकऱ्या उपलब्ध होणार असल्याचे व यासाठी राज्य शासनाने बीपीओ योजनेसंदर्भातील आवश्यक त्या माहितीचा अहवाल केंद्र शासनास सादर केल्यानंतरच ती योजना राज्यात राबविण्यात येणार असल्याची बाब केंद्र शासनाने महाराष्ट्र राज्य शासनास माहे मे, २०१५ मध्ये वा त्यादरम्यान कळविलेली आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, याबाबत राज्य शासनाकडून आवश्यक माहितीचा अहवाल केंद्र शासनास सादर केला आहे काय, असल्यास त्याचे स्वरुप काय आहे व राज्यात किती नोकऱ्या उपलब्ध होणार आहेत,
(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. सुभाष देसाई :** (१) नाही. तथापि, दिनांक १६ जून, २०१५ रोजी राज्य मंत्रीमंडळाच्या बैठकीत महाराष्ट्राचे 'माहिती तंत्रज्ञान व माहिती तंत्रज्ञान सहाय्यभूत सेवा धोरण-२०१५' यास शासनाने मान्यता दिली आहे.

सदर धोरणामध्ये राज्यातील ग्रामीण व निमशहरी भागात बिझनेस प्रोसेस आऊट सोर्सिंग (बी.पी.ओ) उपक्रमांचे प्रवर्तन करण्यासाठी तरतूद प्रस्तावित केली आहे, बिझनेस प्रोसेस आऊट सोर्सिंग क्षेत्रामध्ये रोजगार निर्माण करण्याची प्रचंड

क्षमता आहे. ग्रामीण व निमशहरी भागात संगणक क्षेत्राचा प्रसार वाढविण्यासाठी संगणक क्षेत्रातील कुशल मनुष्यबळाला त्यांच्या राहत्या ठिकाणीच रोजगार उपलब्ध होऊ शकतो. मात्र हे उपक्रम खाजगी आस्थापनेमार्फत उभारले जाणे अपेक्षित आहे.

(२) प्रश्न उद्‌भवत नाही.

(३) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

**विधान भवन :**
**मुंबई.**

**डॉ. अनंत कळसे**
**प्रधान सचिव**
**महाराष्ट्र विधानसभा**

---

मुद्रणपूर्व सर्व प्रकिया महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालयाच्या संगणक यंत्रणेवर
मुद्रण: शासकीय मध्यवर्ती मुद्रणालय, मुंबई.